

# इतिहासाची विलग पाने

डॉ. स्मिता दामले

# इतिहासाची विलग पाने

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# इतिहासाची विलग पाने

डॉ. स्मिता दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

# इतिहासाची विलग पाने (इतिहास)

डॉ. स्मिता दामले

३०३, सुकल्याण, २९, आयडियल कॉलनी,

कोथरूड, पुणे, ४११०३८.

मोबाईल :- ९८६७३६४६३४.

smitasuhas67@rediffmail.com

suhasdamle341@hotmail.com

Mobile: 9867364634

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

या पुस्तकात व्यक्त केलेली मते व नोंदी ही लेखिकेची असून प्रकाशक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

प्रकाशन : ६ जून २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# पाने उलटतांना

मी इतिहास.

सदैव काळाबरोबर राहतो.

त्याच्याबरोबर जगभर फिरतो.

मार्गात दिसणारी नररत्ने, वास्तूरत्ने, क्षणरत्ने, वचने,

झोळीत भरतो.

त्यातीलच ही काही मौल्यवान रत्ने.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फ़े आज डॉ. स्मिता दामले यांचे पाचवे पुस्तक, ’इतिहासाची विलग पाने” प्रकाशित होत आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. हिंमते मर्दा. मददे खुदा. आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. त्याचबरोबर दर्जेदार लिखाण करणारे लेखकही या चळवळीत जोडले जात आहेत. डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळया अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोर्‍यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण

होणाऱ्या कथांच्या संग्रहानंतर त्यांनी कलाटणी हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त” हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे पुस्तक हे. ई साहित्य तर्फ़े डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. चारही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास.

डॉ स्मिता दामले यांना राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे,

शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री" ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी " उदयास्त " ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय आणि व्यक्तिगत चरित्र नुकतंच प्रसिध्द झालं आहे.

त्यांनी आजवर लिहीलेल्या इतिहासावरील पुस्तकांना नामवंत प्रकाशकांनी मानधनासहित प्रसिद्धी दिली. वाचकांची उदंड पसंती त्यांना मिळाली. अशा वेळी ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली पाच मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य द्यावीत यातच त्यांची खरी ओळख होते.

ई साहित्य डॉ. स्मिता दामले यांची कायम ऋणी राहील.

**टीम ई साहित्य**







1. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kalatani_smita_damle.pdf
2. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/lokmanya_-_final.pdf
3. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/raksha_smita.pdf
4. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/raksha_smita.pdf






# प्रस्तावना

सन १९९६ मध्ये '' The role of Patawardhas In Maratha History '' या विषयावर Ph. D. करतांना अनेक थोर इतिहासतज्ञांच्या ऐतिहासिक पुस्तकांचं वाचन झालं. पेशवेदप्तर, ऐतिहासिक पत्रे वाचतांना, मोठे राजकारण खेळणाऱ्या ऐतिहासिक व्यक्तींच्या मनोव्यापाराची, विचारांची ओळख झाली. त्यातून बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई यांना नायिका करून संभाजीराजांपासून शाहूराजे आणि बाळाजी विश्वनाथ-बाजीराव-नानासाहेब पेशव्यांच्या काळापर्यंतचा इतिहास सांगणारं " मातोश्री " या ऐतिहासिक कादंबरीचं लेखन झालं. पटवर्धन विषयावरील प्रबंधावर आधारित पटवर्धन घराण्याचा कुलवृत्तांत सांगणारी " उदयास्त " कादंबरी लिहिली. यात माधवराव पेशव्यांची कारकीर्द आली होती. पटवर्धन आणि माधवरावांचा संबंध सतत मैसूरच्या हैदरअली आणि टिपू सुलतान यांच्याशी सतत आला. त्यातून " मी टिपू सुलतान " ही ऐतिहासिक कादंबरी लिहिली. या तीनही ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये काल्पनिक प्रसंगांना दूर ठेवलं.

आणि मग लक्षात आलं की भविष्य काळ अंधारात असतो, पण इतिहास हा लख्ख उजेडासारखा असतो. भारतीय इतिहासात अजूनही चमकत राहणारी हजारो नररत्ने आहेत, त्यांची सलग ओळख वाचकांना करून देणं जरूरीचं आहे. त्यातील प्रत्येक व्यक्तीवर एकेक ग्रंथ निघेल असा त्यांचा वकूब आहे. म्हणून भारत भूमीवर होऊन गेलेल्या सर्व सत्तांचा धावता इतिहास " कलाटणी " या पुस्तकातून

वाचकांसमोर ठेवला. ‘ स्वराज्य हा हक्क आहे ’ एवढीच लोकमान्यांची राजकीय ओळख असणार्यांसाठी लोकमान्य टिळक यांचं बालपण आणि तरूणपण सांगणारं, सूर्यपुत्र लोकमान्य हे लेखन केलं. वृत्तपत्रांमध्ये येणाऱ्या बातम्यांना संदर्भ असलेल्या घटनांवर आधारित “ मनसोक्त ” हे लघुनिबंधांचं लेखन केलं. “ रक्षा ” हा रक्षा शब्दाच्या विविध अर्थांशी निगडीत कथासंग्रह लिहिला. आनंदाची गोष्ट म्हणजे ही चारही पुस्तकं ईसाहित्य. कॉमने प्रसिध्द केली. त्यांच्या जगभरच्या व्याप्तीचा प्रत्यय, जेव्हा परदेशातून वाचकांचे फोन आले तेव्हा लक्षात आला..

डॉ. स्मिता दामले

३०३, सुकल्याण, २९, आयडियल कॉलनी,

कोथरूड, पुणे, ४११०३८.

मोबाईल :- ९८६७३६४६३४.

smitasuhas67@rediffmail.com

suhasdamle341@hotmail.com

Mobile: 9867364634

# अनुक्रम


अब दिल्ली दूर हैं.

साहित्य-संगीतातील ध्रुवतारा अमीर खुस्रो.

एक प्रवाद.: संगीतशत्रू औरंगजेब

औरंगजेबाचा काश्मीर प्रवास.

कसा बनला दिल्लीचा लाल किला

“ काका मला वाचवा.. . ”

गोष्टी सांगेन युक्तीच्या चार.

झाले बहू होतील बहू : लो. टिळक

पुण्यातील चातुर्य संपलं : नाना फ़डणवीस

पृथ्वीराज चौहान आणि संयोगिता.

बैसाखीचा वणवा : जालियनवाला बाग

मुहंमद शाह रंगीले - सदारंग आणि अदारंग

राजधानी दौलताबाद: म. तुघलक

विवेके करावे साधन.

सारायेवो. एक वणवा.

स्वराज्यात अंधार: भीमा कोरेगावची लढाई


इतिहासाची विलग पाने

# अब दिल्ली दूर हैं.

# हनोज दिल्ली दुरुस्त.

**इ. स. १२३८ मध्ये जन्मलेल्या आणि ३ एप्रिल १३२५ मध्ये दिल्लीत देह ठेवलेल्या हजरत निजामुद्दीन औलिया या सिद्धपुरुष सुफी संताचा प्रभाव जनतेवर, सत्ताधीशांवर त्यांच्या हयातभर राहिला. त्यांचं हे वचन तर आजही सर्वांच्या मुखात आहे..**

खरं तर मूळ कहावत आहे ती " अब दिल्ली दूर हैं " अशी, पण सर्वांना परिचित आहे ते " अब दिल्ली दूर नहीं " थोरामोठ्यांनी ज्या प्रसंगात ती वाक्यं म्हटलेली असतात, ती इतिहास प्रसिध्द होतात आणि लोकांच्या स्मरणात राहतात. हे दोन्ही उद्गार दोन थोर व्यक्तींचे कालानुरून आणि प्रसंगानुरूप उच्चारलेले आहेत.

" अब दिल्ली दूर हैं " हे प्रसिध्द वचन आहे ते चिश्ती परिवारातील एका महंमद निजामुद्दीन अवलिया नावाच्या एका सिद्धपुरुष सूफी संताचं.. १२३८ साली बदायु गावात जन्मलेला हा मुलगा महबूबे इलाही या नावानेही इतिहास प्रसिध्द झाला. पाचव्या वर्षी वडील वारले. थोड्याच अंतराने आईही गेली. सोळाव्या वर्षी दिल्लीत मेहेरोली भागात आले. एकटेच होते. विसाव्या वर्षी बाबा फरीदचे शिष्य बनले. दिल्लीतील गोंधळ, गडबड पाहून दिल्ली सोडून दिल्लीजवळ

गयासपूर नावाच्या शांत जागेत राहायला लागला. तिथेच भक्तीत रमला. त्याच्या दर्शनासाठी भक्तांचा घोळका जमायला लागला. मोठे मोठे अमीर-उमराव-गरीब, सर्वच त्याच्या दर्शनासाठी यायचे. बादशहाही यायचा. पण निजामुद्दीनच्या लेखी सर्व समान असत. उलट दरबारी लोकांपासून ते लांबच राहात. सुलतान बलबन, अल्लाउद्दिन खिलजी त्याचे भक्त होते. अल्लाउद्दीनच्या मृत्युनंतर खिजरखान भावाला अंध करून, ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर कैदेत ठेवून, धाकटा मुलगा कुतुबुद्दीन गादीवर आला.

सुलतान कुतुबुद्दीन मात्र या औलीयाचा राग राग करत असे. तो हजरत निजामुद्दीनला सतत त्रास द्यायला लागला. त्याला तलवारीच्या धाकावर दरबारात हाजीर करायचा त्याने फतवा काढला, तर तो स्वत:च त्याच्या गुजराथी वजिराच्या हातून मारला गेला. या वजिराने मुसलमान धर्म स्वीकारून खुस्रोखान या नावाने तखत बळकावलं. हा निजामुद्दीनचा भक्त होता. त्याने लगेच 5 लाख रुपये त्यांच्या मठाला भेट म्हणून पाठवले. निजामुद्दीनने ते सारे रुपये लोकांच्यात वाटून टाकले. काही काळातच दिल्लीवर परत मुलतानचा सुभेदार गयासुद्दिन तुघलक फौज हल्ला करायला आला.. खुस्रोखान हरला. रण सोडून पळून गेला आणि तिलपात भागातील एका बागेत जाऊन लपला. फकिराचा वेष घेऊन राहिला. 3/४दिवस उपाशी राहिला. भूक अनावर झाली तेव्हा आपल्या हातातील मौल्यवान अंगठी बागेच्या माळयाजवळ दिली. ती विकून काहीतरी खायला आण म्हणाला. माळी हलवायाच्या दुकानात गेला आणि त्याने पैशाच्या बदल्यात ती अंगठी पुढे केली तेव्हा ती बहुमोल अंगठी पाहून हलवाई चमकला. तेवढ्यात गावातला कोतवाल तिथे आला. ती अंगठी पाहून त्याने फकिराला अटक केली, तेव्हा तो खुस्रोखान आहे हे कळल्यावर त्याला घेऊन कोतवाल गयासुद्दीनकडे दरबारात गेला. तुझ्याशी काय न्याय करायचा असं सुलतानाने खुस्रोखानला विचारलं तेव्हा जसं पोरसबरोबर

सिकंदर वागला तसाच असं खुस्रोखान उत्तरला. पण गयसुद्दीनाने काही निर्णय घ्यायच्या आत त्याच्या मुलाने खुस्रोखानचं मुंडकं उडवून त्याला ठार केलं.

गयासुद्दिन तुघलक नवीन सुलतान झाला.

आता गयासुद्दिनने नवा सुलतान झालाबरोबर लगेच निजामुद्दीन औलीयावर  राग काढायला सुरुवात केली. सरकारी खजिन्यातून, खुसरोखानने दिलेले 5 लाख रुपये त्याने परत मागितले. पण त्या फकीर, हजरत निजामुद्दीनसाहेबांनी तर ते सारे पैसे गोरगरिबांमध्ये वाटून टाकले होते. मग त्याच्यावर सूड उगवायला त्याने दर्ग्यातला गाण्याबजावण्याचा आवाज बंद करायचा हुकूम दिला. निजामुद्दीनने तेही ऐकलं नाही. त्याच वेळी सुलतान आपला किल्ला बांधत होता, आणि निजामुद्दीन औलीया लोकांसाठी विहीर खोदत होता. त्यावेळी काही मजूर दिवसभर सुलतानाचं काम करून रात्री निजामुद्दीन संताच्या विहिरीचं काम करत होते. सुलतानाला याचा राग आला आणि त्याने गावभर दवंडी पिटली की रात्री चालणाऱ्या या कामासाठी दिवे जाळायला निजामुद्दीनच्या दर्ग्याला जे तेल लागतं ते कुणीही पुरवू नये. मग निजामुद्दीन यांनी पाणी भरलं आणि दिवा जाळला. म्हणून लोक त्यांना रोशनचिराग या नावाने ओळखायला लागले.

एकदा मात्र कळस झाला आणि गयासुद्दीनने या औलीयाला दिल्ली सोडून जायचा हुक्म पाठवला तर त्याला स्वत:लाच बंगालच्या स्वारीवर जावं लागलं. त्या प्रवासात सुलतान सतत, आपण येण्याआधी निजामुद्दीन फकिराला दिल्ली सोडायचा निरोप पाठवत होता, आणि दरवेळी हजरत त्याला उलटा निरोप पाठवायचे.. " हनोज दिल्ली दुरुस्त.. '' शेवटी बंगालची मोहीम संपवून गयासुद्दिन यमुनेच्या तीरावर दिल्लीच्या जवळ आला. मी पोचण्यापूर्वी दिल्ली सोड असा

निरोप सुलतानाने पाठवलं तर फकिराने त्याला उलटा निरोप पाठवला, “ हनोज दिल्ली दुरस्त ” म्हणजे “ अभी दिल्ली दूर हैं ”

बादशहाच्या प्रत्येक मुक्कामातून हाच निरोप यायचा आणि फकीरही “अब दिल्ली दूर है” असाच निरोप पाठवायचा. सुलतान आता दिल्लीपासून अवघ्या चार मैलांवर अफगाणपूरमध्ये येऊन थांबला. त्याच्या उतरण्याची व्यवस्था सुलतानाच्या मुलाकडेच, महंमद तुघलकाकडे होती. सुलतान मुक्कामाला येणार म्हणून घाईघाईने एक लाकडी महाल उभारला गेला. सुलतान त्या घरात गेला आणि पाठीमागून येणाऱ्या हत्ती-घोडे यांच्या गर्दीत वजनाने तो महाल कोसळला. त्यात सुलतान गयासुद्दिन ढिगार्याखाली अडकून मरण पावला. कुणी म्हणतात की वीज पडली आणि लाकडी महाल जळून कोसळला..

हजरत निजामुद्दीन औलीयाचं म्हणणंच खरं झालं. गयासुद्दिन तुघलक सुलतानाला दिल्ली दूरच राहिली. तेव्हापासून जे अशक्य आहे त्याला “अब दिल्ली दूर हैं म्हणायची पद्धत रूढ झाली.

---

“ अब दिल्ली दूर नहीं ” हे वाक्य म्हटलं सुभाषचंद्र बोस यांनी.. . जपान्यांच्या मदतीने त्यांनी ब्रिटीशांवर हल्ला करायची योजना आखली होती. भारतचं स्वातंत्र्य आता फार दूर नाही हे दिसत होतं तेव्हा त्यांनी “ अब दिल्ली दूर नहीं ”हे शब्द उच्चारले होते. जे काही उद्दिष्ट आवाक्यात आलं असेल तर तेव्हा ‘’ अब दिल्ली दूर नहीं ‘’ म्हणायचा प्रघात पडला..

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—

# साहित्य-संगीतातील ध्रुवतारा अमीर खुस्रो.

**4 लाखांवर फारसी शेर लिहिणाऱ्या, आजही आपला ठसा कायम ठेवणाऱ्या या थोर साहित्यिकाचा जन्म उत्तर प्रदेशातील पतीयाली गावात इ. स. १२५३ मध्ये झाला. यांचं पूर्ण नाव अबुल हसन यामिनुद्दिन खुस्रो. ऑक्टोबर १३२५ मध्ये यांनी दिल्लीतच देह ठेवला. त्यांचं दफन हजरत निजामुद्दीन यांच्या कबरी शेजारीच झालं.**

उर्दू-फारसी-हिंदवी साहित्यातील आणि हिंदुस्तानी संगीतातील एक उत्तुंग, अपूर्व दबदब्याचं नाव म्हणजे अमीर खुस्रो. फार मोठे शायर, संगीत क्षेत्रातही त्यांचं योगदान मोठं होतं, लष्करी मोहिमांमध्ये ही त्यांचा सहभाग होता..

यांचे वडील अमीर सैफुद्दीन तुर्कस्थानातून हजारालाचैन मधून, चंगीजखानच्या हल्ल्यातून जीव वाचवून, तुर्कस्तानातून भारतात आले तेव्हा भारतात गुलाम राजवटीतील अल्तमश म्हणजे कुतुबुद्दीन ऐबकचा जावई, सुलतान होता. या तुर्की बादशाहाने अनेक तुर्की लोकांना आश्रय दिला. भारतात आल्यावर सैफुद्दीन १०,००० मोहरांचे पतीयाली गावाचे जहागीरदार झाले. त्यांची पत्नी राजपूत होती. सुलतान अल्तमशच्या युध्दमंत्र्याची ती मुलगी होती. तिचा पोटी आमिरचा जन्म एटा जिल्ह्यातील ( आता उ. प्र. ) पतीयाली

नावाच्या खेड्यात झाला ते साल होतं इ. स. १२५३. या नवजात बालकाला घेऊन वडील सैफुद्दीन फकिराकडे गेले. बालकाचा चेहरा पाहून फकिराने भविष्यवाणी केली की हा फार मोठा शायर होणार..

अमीर छोटा असताना सैफुद्दीन त्याला एका कवी संमेलनाला घेऊन गेले. तिथे या बालकाची शायरी ऐकून भलेभले शायर चक्रावले इतकी सुंदर त्यांची नज्म होती. अमीर ९ वर्षांचे असतांना त्यांचे वडील वारले, तेव्हा त्यांची आई माहेरी रहायला गेली. अमीर खुस्रो यांचं सर्व शिक्षण मामाकडेच झालं. अमीर २० वर्षांचे झाले तेव्हा त्यांना किशलूखां नावाच्या एका सरदाराने आपल्या घरी नोकर म्हणून ठेवून घेतलं. हा सरदार कलाकारांचा मोठा आश्रयदाता होतं. तो खूष झाला की कलाकाराला मालामाल करून टाकत असे. एकदा तर एका शायरला तर त्याने आपली सगळी पागा बक्षीस दिली. अनेक जलसे त्यांच्या घरात व्हायला लागल्यामुळे अमीर खुस्रोची कीर्ती वाढत गेली. या सरदाराकडे सुलतान बलबन याचा मुलगा बुगराखां शायरी ऐकायला येत असे. तो आमिर खुस्रोच्या शायरीवर खूष झाला आणि त्याने खूप मोठा पैसा बक्षीस म्हणून दिला. अमीर खुसरोचं ती भेट घेणं किशलूखांला पसंत नव्हतं. त्यावरून मतभेद होऊन अमीर खुसरोला किशालूखांची नोकरी सोडावी लागली. तिथून तो बुगराखानकडे राहिला. पण जेव्हा बुगाराखान बंगालला गेला, तेव्हा अमीर खुस्रो बुगाराखांच्या भावाकडे मलिक महंमदकडे मुलतानला गेले.

मुलतानमध्ये ते ५ वर्षे होते. यावेळी मोंगलांचा मोठा हल्ला मुलतानवर झाला. त्या लढाईत अमीर खुस्रोही होते. मलिक महंमद मंगोल या हल्ल्यात मरण पावला आणि अमीर खुस्रो युद्धकैदी झाले. एक मंगोल स्वार त्यांना घेऊन परत जात असतांना वाटेत तो स्वार आणि त्याचा घोडा कडक उन्हामुळे तहानेने व्याकूळ झाले. उन्हाच्या माऱ्याने थकूनही गेले होते. एका पाणवठ्यावर तो स्वार थांबला. भरपूर पाणी प्याला, घोड्यालाही पाणी दाखवलं आणि घोडा आणि स्वार दोघेही

गाढ झोपले. तेव्हा अमीर खुस्रो तिथून निसटले आणि हिंडत हिंडत दिल्लीला येऊन पोचले. त्यांची आई आणि भाऊ ६ महिन्यांच्या अंतराने वारले.

आपल्या आयुष्यात त्यांनी, गुलाम वंशाचे सुलतान अल्तमश-रझिया सुलतान आणि पुढचे वारस, खिलजी घराण्याचा उदय आणि त्यांचे वंशज असे दिल्लीच्या सल्तनीत अकरा बादशहा कारभार करतांना पाहिलं. त्यातील ७ बादशहांच्या दरबारात ते शायर, विद्वान, लढवय्ये, म्हणून चाकरीत होते. कुतुबुद्दीन ऐबकपासून सुरु झालेली गुलाम वंशांची राजवट संपून खिलजी घराण्याकडे सत्ता आली त्याचे ते साक्षीदार होते. खिलजी सत्तेचा पाया घालणाऱ्या जलालुद्दीन खिलजी याने खुस्रोंच्या प्रतिभेचा सन्मान करून त्यांना अमीर ही पदवी दिली. दरसाल १०० मोहरा जलालुद्दीन त्यांना भेट देत असे. सर्व सुलतानांनी त्यांच्या विद्वत्तेचा, सुफी अभ्यासाचा, खगोल शास्त्रातील गतीचा, काव्याचा आणि साहित्याचा सन्मान केला.

अरबी-इराणी-तुर्की-फारसी भाषेवर त्यांचं प्रभुत्व होतं. ९० पेक्षा जास्त पुस्तकं लिहिली. खिलजी घराण्याचा इतिहास लिहिला. त्यांनी 4 लाखांवर शेर लिहिले. भारतीय भाषांमध्येही त्यांनी लेखन केलं. उर्दू या भाषेचे ते जनक आहेत. अवधी-ब्रजभाषा-तुर्की-फारसी-अरबी भाषांच्या अभ्यासातून त्यांनी ही भाषा निर्माण केली. तुर्की सुलतानांना भारतीय भाषा येत नव्हती त्यामुळे राज व्यवहाराला अडचण पडायची. उर्दूमुळे प्रजा आणि राजा यांच्यामध्ये संवाद सुरु झाला.

ज्योतिष शास्त्राचाही त्यांचा अभ्यास दांडगा होता. सुफी आणि वेदांताचा मोठा जाणकार म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांचं हिंदुस्थानवर निरतिशय प्रेम होतं. सुलतान कुतुबुद्दीन खिलजीच्या इच्छेनुसार त्यांनी भारताच्या सुंदरतेचं, निसर्गाचं सुंदर वर्णन करणारं " नु सिपहर " म्हणजे नऊ स्वर्ग नावाचं

एवढं सुंदर काव्य लिहिलं की बादशाहने खूष होऊन हत्तीच्या वजन एवढं सोनं बक्षीस दिलं. भारतावर त्यांचं मनस्वी प्रेम होतं. त्यांनी हिंदुस्थानचं वर्णन करतांना म्हटलंय,

1. हिंदुस्थान विद्वत्ता आणि शिक्षणात अग्रस्थानी आहे. २. येथील लोक जगभरच्या भाषा पटकन आत्मसात करतात. ३. जगभरच्या कानाकोपऱ्यातून लोक इथे शिक्षण घ्यायला येतात. 4. इथले लोक गणितात फार हुशार आहेत. शून्याचा शोधही याच देशात लागला आहे. ५ येथील विद्वानांनी फार अभ्यासपूर्ण ग्रंथ रचना केली आहे. ६. बुद्धिबळ या खेळाचा जनकही हाच देश आहे. ७. या बुद्धिबळ खेळणे आणि ग्रंथांनी साऱ्या जगात भारताचं नाव रोशन केलं आहे. ८. हिंदुस्थानी संगीत हे कमालीचं श्रेष्ठ संगीत आहे. असं संगीत जगात कुठेही नाही. १०. इथले ऋतू, पशु-पक्षी-फुलं-फळांची रेलचेल, सुगंध भाषा, संस्कृती सगळंच अवर्णनीय आणि अतुलनीय आहे. आणि शेवटी ते मार्मिकपणे म्हणतात, ११. हिंदुस्थानशिवाय इतर कोणत्याही देशात अमीर खुस्रोसारखा महान कवी मिळणार नाही.

संगीतातील त्यांचं कार्य अपूर्व आहे. इराणी-तुर्की-अरबी धून भारतीय संगीतात मिसळून त्यांनी अनेक नवीन राग निर्माण केले. कव्वाली, ख्याल, तराणा, गझल, यांचे तेच निर्माते मानले जातात. सतारीचे ( सहतार ) तेच जनक आहेत. मल्हार गीत-सावन गीत- झुला गीत- विरह गीत-बाल गीत अशा अनेक लोकसंगीतातील रचना तयार केल्या. त्यांनी तराना कसा निर्माण केला त्याची कथा फारच रोचक आहे. अल्लाउद्दिन खिलजीने देवगिरीच्या राजगायक गोपाल नायक यांना त्याच्या दरबारात गायन करायला आमंत्रित केलं. सलग ६ दिवस गोपाल नायकाने ( नायकी कानडा हा राग गोपाल नायकने निर्माण केला आहे ) राग कदंबक पेश केला. त्यावेळी अमीर खुस्रो लपून राहून गोपाल नायकाचं गाणं ऐकत होते. गोपाल नायकचं गायन संपल्यावर ७ व्या दिवशी अमीर खुस्रो लोकांसमोर

आले. गोपाल नायकांची गायकी त्यांनी जशीच्या तशी गाऊन सर्वांना चकित तर केलंच पण त्यांना जे शब्द कळले नाहीत ते त्यांनी  दिडदा, तोम असे शब्द वापरून म्हणून त्यांनी ते सगळं जसंच्या तसं पेश केलं, असा तराना निर्माण झाला. इतकं त्यांना शास्त्रीय संगीतातील अफाट ज्ञान होतं.

त्यांच्या शीघ्र कवित्वाची एक आख्यायिका अशी की, एकदा अमीर खुस्रो प्रवास करत होते. त्यांना तहान लागली. तेव्हा ते एका विहिरीपाशी आले. तिथे काही स्त्रिया पाणी भारत होत्या. त्यांनी खुस्रोना ओळखलं. त्यातील एका स्त्रीने विचारलं, आम्ही तुमची झुला वगैरे गाणी गातो तेच ना तुम्ही अमीर खुस्रो. ? खुस्रो हो म्हणाले. तेव्हा त्या स्त्रिया त्यांना म्हणाल्या, आम्ही ४ शब्द देतो. त्या चार शब्दांवरून कविता करून दाखवा तरच आम्ही तुम्हाला पाणी देऊ. ते शब्द होते, चरखा, खीर, ढोल, आणि कुत्ता.. खरं तर कशाशी काही संबंध नसलेले ते शब्द होते. पण खुस्रोंनी पटकन २ ओळी रचल्या. ते म्हणाले,

“ खीर पकाई जतनसे, चरखा दिया जला,

आया कुत्ता खां गया, तू बैठी ढोल बाजा,


ला पाणी पिला. ”

बालपणापासून ते हजरत निजामुद्दीन औलीयाचे परम भक्त होते. हजरतांचं  सुद्धा अमीर खुस्रोवर निरतिशय प्रेम होतं. निजामुद्दीन यांचं देहांत झाल्यावर ६ महिन्यातच वयाच्या ७२ व्या वर्षी ऑक्टोबर १३२५ मध्ये अमीर खुस्रो यांचंही निधन झालं आणि औलीया हजरत निजामुद्दीनच्या कबरीजवळच त्यांचं दफन झालं.

अमीर खुस्रो, साहित्य क्षेत्रातील इराणच्या श्रेष्ठ साहित्यिक शेख सादी यांच्या बरोबरीने श्रेष्ठ मानले जातात.

अमीर खुस्रो हे, भारताच्या इतिहासातील एक सुवर्ण वृक्ष आहेत.

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—



# एक प्रवाद.

**इतिहासप्रसिध्द लोकांच्या कीर्तीबरोबरच आख्यायिकाही पिढ्यान पिढ्या चालू राहतात. ज्याला संगीत कळत नाही, त्याला आपण सहज “ तो गाण्यातला औरंगजेब आहे असं म्हणतो. पण खरं तर औरंगजेब नृत्य-संगीताचा फार मोठा जाणकार आणि सौंदर्याचा शौकीन होता. मग त्याची अशी कीर्ती का झाली त्याची ही कहाणी.. .**

शहाजहानला आपला लाडका मोठा मुलगा दर शुको बादशहा व्हावा अशी इच्छा होती, म्हणून त्याने आपल्या इतर मुलांना राजधानीपासून दूर पाठवून दिलं. त्यात औरंगजेबाला शहाजहानने दख्खनच्या सुभेदारीवर पाठवलं. एका सुटीत हा शहजादा त्याच्या मावशीकडे बरहानपूरला गेला. मावशीचा, खालाजानचा भाचाच असल्याने जनानखान्यातील मुली त्याच्यासमोर परदा घेत नव्हत्या. औरंगजेब खाण्यापिण्यात संगीत ऐकण्यात मस्त दंग होता. एकदा तो खालाजनाच्या हिरन बागेत फिरत असतांना हिराबाई नावाची एक अत्यंत सुंदर मुलगी सुंदर गात होती. शहाज्यादा वेडाच झाला तिला पाहून ! इतका बेशुद्धच झाला. भाच्याची ही अवस्था पाहून मावशी धावत आली आणि काळजीत पडून काय झालं विचारलं तर औरंगजेबाने ती गाणारी सुंदर मुलगी मला दे असं सांगितलं.

मावशी घाबरली आणि म्हणाली की माझ्या नवऱ्याची-मीर खलीलची ती अत्यंत आवडती लौंडी आहे. मी तिला तुझ्याकडे पाठवली तर तो आम्हाला

मारून टाकेल. औरंगजेबाने निराश होऊन नाद सोडला आणि तो सुभेदारीवर औरंगाबादला परत आला. पण त्याचं कामात लक्ष लागेना इतका तिच्यासाठी वेडा झाला होता. शेवटी त्यानेच मीर खालिलला पत्र लिहून हिराबाईला पाठवून द्यायची विनंती केली.

मीरने औरंगजेबाच्या दरबारातील गायिका चतुरबाईला आपल्याकडे पाठवायला सांगितलं आणि हिराबाईला शहज्यादाकडे पाठवलं. हिराबाई आल्यावर तिच्या सहवासात वेडाच झाला. औरंगजेबाच कामातलं लक्षच उडालं. ही बातमी बादशहापर्यंत पोचली. शहाजहानने दिल्लीहून त्याला भानावर आणायला पत्र लिहिलं पण उपयोग होत नव्हता. पण काही दिवसांनी हिराबाई अचानक मरण पावली. तिच्या मृत्यूने औरंगजेब खूप उदास झाला. तिची आठवण झाली की मन रमवायला शिकार खेळायला निघून जायचा. संगीत आणि नृत्याचा आस्वाद घेणं तर त्याने बंदच करून टाकलं.

औरंगजेब शहाजहानला कैदेत टाकून जेव्हा बादशहा झाला तेव्हा त्याने अनेक गुणीजनांना सन्मानित केलं. तानसेनचा मुलगा बिलासखानाच्या नातेवाईक मुलाला त्याने धृपद- धमारच्या गायकीबद्दल " गुणसमिंदर " ही पदवीसुद्धा दिली होती. कृपाराय नावाच्या उत्तम मृदंग वाजवणाऱ्या कलाकाराला त्याने " मृदुंगराय" हा किताब दिला होता. इतका जाणकार बादशहा स्वत: मात्र दरबारात संगीत ऐकायला थांबायचा नाही. दरबारातील गायकही त्याच्याकडून कदर न मिळाल्यामुळे नाराज झाले. पण त्याचे मुलगे, बेगमा यांच्याकडून गायकांची वाहवा होत होती. पण औरंगजेबाचा संगीताबद्दलचा राग वाढतच गेला. दरबारात आपल्या कलेची कदर होत नाही हे पाहून संगीत कलाकारही उदास झाले.

एकदा औरंगजेब जामा मस्जीदमध्ये नमाज पढायला जात असतांना त्याला काही गवैय्ये प्रेताचा जनाजा घेऊन जाताना दिसला. औरंगजेबाने एका

गवैय्याला बोलावून कोण मेलंय असं विचारलं, तेव्हा बादशाहाला पाहून त्या गायकाने संगीताचा जनाजा चालला आहे असं उत्तर दिलं.

औरंगजेब त्याला म्हणाला, “ त्या संगीताला चांगलं खोल पुरा म्हणजे ते बाहेर यायचं नाही. ” त्याच्या या वाक्याचा सुरुवातीला दिल्लीभर कुजबुजीत, नंतर जनप्रवाद, नंतर वदंता असा असर होऊन शेवटी औरंगजेबाला गाण्यातील काहीही कळत नव्हतं इथपर्यंत प्रवास झाला. हिराबाईच्या मृत्युनंतर त्याने कधीही गाणं ऐकलं  नाही हे लोक विसरूनच गेले.

S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S

# औरंगजेबाचा काश्मीर प्रवास.

**बाबरमुळे दिल्लीची सत्ता मुघल, मोघल, मोंगल काहीही म्हणा, मुळात मंगोल घराण्याकडे सत्ता गेली. बाबर-हुमायून-अकबर-जहांगीर-शहाजहान-औरंगजेब अशा अतिरथी महारथी सत्ताधीशांनी काबूलपासून विजापूरपर्यंत साम्राज्य पसरवलं. औरंगजेबानंतर या घराण्याला उतरती कळा लागली. १८५७ च्या स्वातंत्र्यायुद्धानंतर बहादूरशहा जफरच्या अटकेनंतर हे घराणं संपलं. मोठे मोठे जनानखाने, मोठे मोठे महाल, मोठ्या मोठ्या बागा, विलास, ऐश्वर्याचा आणि त्याच्या प्रदर्शनाचा सोस हा त्यांचा स्वभाव. औरंगजेबाचा बादशाही थाट, रुबाब मराठ्यांच्या फौजांनी पाहिला आणि हळूहळू तो मराठी फौजेत झिरपला.**

दिल्लीतील उन्हाळा असह्य व्हायचा म्हणून दिल्लीची राजधानी ६ महिने काश्मीरला हलत असे. हे आहे औरंगजेबाच्या १६६० सालचं काश्मीर प्रवासाचं वर्णन.

उन्हाळा सुरु व्हायच्या आधी प्रवासाला लागायचं म्हणून ज्योतिषाने ६ डिसेंबर हा दिवस शुभ दिवस औरंगजेब बादशाहाला काढून दिला. औरंगजेब आणि त्याची बहीण रोशनआरा बेगम दोघेही काश्मीरला निघायच्या तयारीला लागले. दिल्ली आणि आग्र्याचा कारभार विश्वासू सरदारांकडे सोपवला. संपूर्ण राजधानीच काश्मीरला हलणार म्हणून निवडक असे आपल्या विश्वासातील लोक बादशाहने प्रवासात आपल्याबरोबर घेतले. बरोबरीच्या लोकांना सामील होता यावं म्हणून स्वत: दिल्लीपासून ६ मैलांवर असलेल्या शालीमार बागेत जाऊन राहिला. आपल्या छावणीची जबाबदारी त्याने मूर्तझाखानकडे सोपवली.

कसा होता हा प्रवास..

बादशहाच्या प्रवासात प्रत्येक सामानाचे २ संच बाळगत असत. बादशहाच्या प्रवासाच्या आदल्या दिवशी त्याच्या पुढच्या मुक्कामाचं तंबू वगैरे सामान २०० उंट आणि ५० हत्तींवर लादून बाहेर पडत असे.. आघाडीला जड तोफखाना असे. तोफखान्याच्या मागे, वाटेतील नदी ओलांडण्यासाठी म्हणून बादशहासाठी एक सजवलेली शाही नौका ठेवलेली असे. डच लोकांनी दिलेल्या सिंहासनावर तो बसे. ती खुर्ची वाहायला १२ मजूर लागत. शिवाय ३ पालख्याही बरोबर घेतलेल्या असत. बादशहा जरूर आणि इच्छा असेल तसा यांचा वापर करत असे. त्यानंतर लवाजमा, छावणीचं सामान जाई. छावणीत तंबू ठोकण्यासाठी फावडी-कुदळी या कामासाठी लागणारे मजूर १००० असत. हा सगळा परिवार पुढे जाऊन बादशहाचा तंबू ठोकत असे. त्या भोवती लहान तोफा उभ्या केल्या जात. सकाळपर्यंत मुक्कामाचा तळ रिकामा होई, फक्त घोडदळ आणि पायदळ बादशाहाच्या रक्षणासाठी मागे राहत असे.

साम्राज्याच्या कारभारासाठी पुढील ४/६ महिन्यांसाठी बादशहाचा दफ्तरखानाही बरोबर असे. ही कागदपत्रे वाहण्यासाठी ८० उंट, ३० हत्ती, आणि २० गाड्यांचा उपयोग केला जाई. बादशहाला लागणाऱ्या पाण्यासाठी प्रत्येक उंटावर २ मोठे मोठे हंडे, असे ५० उंट पाणी वाहून नेत. त्यामागे लहान तंबू वाहणारी ८ खेचरे असत. प्रवासात काही खावं असं वाटलं, शारीरिक गरजा भागवण्यासाठी, किंवा विश्रांती घ्यावीशी वाटली तर ते तंबू उभे केले जात असत. अत्तराच्या बाटल्यांसाठी २ खेचरे लागत. बादशहाच्या जेवणाच्या तयारीसाठी भांडी वाहण्यासाठी ५० उंट असत. उत्तम दूध देणाऱ्या ५० गाई बरोबर असत. प्रत्येक पक्वान्नासाठी वेगळा स्वयंपाकी असे. त्या प्रत्येकावर एक प्रतिष्ठित अधिकारी नेमलेला असे. जेवणाच्या चांदीच्या तबकांवर झाकण्यासाठी मखमली रुमाल असत.

अतिशय सुंदर चिनी मातीची आणि सोन्या-चांदीची भांडी २०० मजूर उचलून नेत. बादशाहाला भेटण्यासाठी येणाऱ्या लोकांना भेट देण्यासाठी लागणारी वस्त्रे-शस्त्रे-रत्ने-दागिने ३० हत्तींवर लादलेले असत. भेट देण्यासाठी तलवारी-ढाली-खंजीर या शस्त्रांवर रत्नजडीत काम केलेलं असे.

बादशहा सकाळी ६ वाजता प्रवासाला निघे. त्याच्या पुढे १०० हलका तोफखाना असे. २ घोडे एकेक तोफ ओढत असत. औरंगजेब निघाला की नगारे-कर्णे-शिंगे जोरात वाजायला लागत. आघाडीवर ८००० घोडदळाचा सरदार असे. या ८००० घोडदळाच्या मागे उजवीकडे डावीकडे दोन सरदार आपलं घोडदळ घेऊन चालत असतं. बादशहाची ताकद कळावी म्हणून शिकारी स्वार हातावर बहिरी ससाणा घेऊन घोड्यावर बसलेले असत..

बादशहाच्या पुढे पहिले ९ हत्ती शोभेचे ध्वज घेऊन चालत. त्यांच्या मागून ४ हत्ती सूर्य-चंद्राची चिन्हे असलेले हिरवे झेंडे घेऊन चालत. त्यांच्या मागे दागिन्यांनी, सुंदर झूली पांघरलेले २ घोडे आणि त्यावर स्वार असत. एकाच्या हातात अरबी शब्द लिहिलेला ध्वज तर दुसऱ्याच्या हातात नगारा असे. तो घोडेस्वार मधून मधून नगारा वाजवून बादशहाची स्वारी येत असल्याचा इशारा देत असे. बादशहाच्या दोन्ही बाजूने शिस्तीने पायदळ चालत राही. ही शाही मिरवणूक बघायला जमलेल्या गावकर्यांना चांदीच्या काठीने दूर करत. पुढील रांगेतील काही शिपाई बादशाहाला सुखद वाटावं म्हणून मार्गावर सुगंधी पाणी शिंपडत जात.

हा जुलूस जात असतांना बादशहाबरोबर एक अधिकारी असे. कोणत्या भागातून आपण जात आहोत असं बादशहाने विचारलं तर सांगण्यासाठी त्याच्या जवळ मार्गात येणारी नगरं, खेडी, सुभे, जमिनी, त्यांचा महसूल यांची कागदपत्रे असत. बादशहा आणि इतरांना सांगण्यासाठी त्याच्याकडे वाळूचं घड्याळ असे. बादशहाने किती प्रवास केला याची नोंद ठेवण्यासाठी मोजणीचे दोर घेतलेली

माणसे असत. पांढऱ्या कापडाचं ओझं वाहणारा एक उंट आघाडीला असे. एखादं मेलेलं जनावर, माणूस, बादशहाच्या मार्गात पडलेलं दिसलं तर त्याच्यावर ते पांढरं वस्त्र घालून झाकलं जाई. कधी कधी औरंगजेब त्याची चौकशी करत असे.

बादशहाच्या मागे १० घोडेस्वार चालत, त्यांच्याकडे बादशहा वापरत असलेल्या बंदुका लांब जरीच्या पिशवीत ठेवलेल्या असत. प्रत्येकाकडे एकेक वस्तू असे. ढाल-तलवार-भाला-धनुष्य-बाण-खंजीर अशा वस्तू असत. त्यानंतर राजपुत्रांचा परिवार आणि नोकर असत.. त्यामागून जाणाऱ्या बादशहा आणि राजपुत्रांच्यासाठी वापरायच्या पालख्यांच्या मागे कर्णे-नगारे-सनया-डफ-वाहणारे घोडेस्वार चालत असत. नंतर दृष्टीस पडत असत ते ३ अंबारया वाहणारे ३ हत्ती आणि उरलेल्या ३ हत्तींवर इस्लामची चिन्हं, मखमली कापडाने झाकलेले चांदीचे ३ पंजे, आणि इतर चिन्हं ठेवलेली असत. एका काठीवर महंमद न्यायी आहे, असं लिहिलेला फलक, एकावर न्यायाच्या तराजूचा ध्वज, आणखी एका हत्तीवर बादशाहा नद्यांचा स्वामी आहे, हे दाखवण्यासाठी कापड लावलेलं मगरीचं तोंड ठेवलेलं असे. दुसऱ्या काठीवर माशाचं मोठं तोंड आणि त्याला कापडी शरीर असलेलं चिन्ह बादशहा सागराचा स्वामी आहे हे दाखवणारा ध्वज असे. हे पांढरं कापड वाऱ्याने हलत असे, आणि लोकांचं लक्ष वेधून घेत असे. त्यांच्या मागून नौबती, नगारे वाहणारे हत्ती असत.

बादशहाचा हा एवढा लांबलचक लवाजमा संपला की मोठा सरदार जयसिंहाचे ६०,००० स्वार चालत. त्यांच्या मागे इतर सरदारांची फौज चालत असे. या सर्व सरदारांचे ६ हत्ती आणि फौज असे. या पूर्ण शाही मिरवणुकीतील प्रत्येक हत्ती आणि प्रत्येक घोडा मखमली झूल आणि दागिन्यांनी मढलेला असे.

हा पुरुषांचा दिमाख संपला की बादशहाची बहीण रोशनआराची सवारी लोकांना दिसे. तिचा पितांबर नावाचा प्रचंड हत्ती, त्याच्यावरची तिची सोन्याच्या पत्र्याने मढवलेली मीनाकाम केलेली अंबारी, तिच्या घोड्यावर बसलेल्या बुरखाधारी बायका, तिचे खोजे, नोकरवर्ग, मागच्या ६० हत्तींवर राजघराण्यातील इतर स्त्रिया, औरंगजेबाच्या तीन बेगमा, त्यांचा नोकरवर्ग, पालख्यांमधून रोशनआराच्या निवडक सख्या अशी ही स्त्रियांची मिरवणूक वेगळया जवळच्या मार्गाने बादशहाच्या आधी पुढील मुक्कामावर पोचलेल्या असत.

बादशहा मुक्कामाला पोचला की जोपर्यंत तिथे राही, तोपर्यंत रोज रात्री नगारा वाजे. नगारा ऐकू न येणं म्हणजे दुसरे दिवशी प्रवासाला जायचं असा इशारा असे. प्रवासाला निघण्यासाठी बादशहा आपल्या तंबूतून बाहेर आला की राजपुत्र, अधिकारी, अमीर, उमराव, त्याच्या दर्शनाला येत. त्यांच्या अडचणी काही असतील तर बादशहा तिथेच त्याच निवारण करत असे. मग बादशहा आपल्या शिकारी लोकांकडे जाई. त्याला शिकार खेळण्याची इच्छा असेल तर पायदळ आणि अंगरक्षक त्याच्या बरोबर राही. पुढचा मुक्काम जवळ आला की कर्णे, नगारे वाजू लागत. बादशहाचा तंबू हा ५०० पावलांच्या परिघाचा असे. बादशहा आपल्या तंबूत शिरल्यावर हलकासा तोफांचा आवाज होई.

दिल्लीहून निघालेला हा बाजार-दुकान-नोकरचाकर-गुरं-युद्धसामग्री-सोनंचांदी-नाणी, १२ बलुतेदार, खजिना यांनी भरलेला प्रचंड मोठा लवाजमा काही महिन्यांसाठी राजधानी काश्मीरला पोचत असे. तिथून मग औरंगजेबाची फर्मानं निघत.

Ss. ==Ss==Ss==Ss==Ss==Ss==Ss==Ss==Ss

# कसा बनला दिल्लीचा लाल किला.

**आग्र्याचा ताजमहाल आणि दिल्लीचा लाल किला हे दिल्लीच्या, नव्हे, स्थापत्यशास्त्रातील वास्तू कलाकारांच्या कला आविष्काराचं सुंदर लेणं.. अजंठा, वेरूळ, दक्षिणेची उत्तुंग मंदिरं ज्यांनी बांधली ते सारे अनामिकच राहिले. राजाश्रय मिळाला की कलावंतांच्या प्रतिभेचं इतिहासाच्या पटलावरही प्रतिक उमटतं. उस्ताद हमीर आणि उस्ताद हिरा यांच्या कला वैभवाची साक्ष म्हणजे लाल किल्ला.**

उत्तम उत्तम वास्तू उभारण्याचं शहाजहानला वेड होतं.. . मुमताजच्या प्रेमाखातर त्याला ताजमहाल बांधायचं सुचलं ते त्याच वेडापायी.. आजवरचे बाबर-अकबर हे त्याचे सारे दादा-परदादा आग्र्यातच राहत होते. उलट दिल्ली मात्र सततच्या आक्रमणाने उजाड झालेली होती. पण शहाजहानच्या मनात मात्र दिल्लीला आपल्या नावाने अमर व्हावी अशी नगरी आणि आपल्यासाठी एक सुंदर किल्ला बांधायची कल्पना घोळायला लागली. आजवर शहाजहानच्या आधी जे जे सुलतान दिल्लीवर राज्य करून गेले, त्यांनी दरवेळी आपल्या राजधानीसाठी नवीन भाग निवडला होता, आणि पहिला भाग पुराना झाला होता. लंगडा तैमूरच्या आक्रमणानंतर तर दिल्ली उजाडच झाली होती. दिल्लीमध्ये जागेचा तोटा नव्हताच. आता या बादशहाच्या राजधानी हलवण्याच्या इच्छेसाठी नवीन जागेचा

शोध घेण्याची जबाबदारी मुकर्रतखानावर येऊन पडली. त्याने तालकटोराजवळची जागा निश्चित केली.

तशातच एक घटना घडली.

एकदा शिकारीला आग्र्याहून बाहेर पडलेला शहाजहान यमुनेच्या काठाकाठाने हिंडत असतांना त्याला तहान लागली म्हणून तो पाणी शोधायला लागला. त्याला एक झोपडी दिसली. त्या झोपडीत जाऊन त्याने पाणी मागितलं. झोपडीतल्या खेडुताला हा बादशहा आहे याची कल्पना आली नाही. तो बादशाहाच्या ओंजळीत पाणी ओतायला लागला आणि तहानलेला बादशहा भराभरा पाणी प्यायला लागला. तेव्हा त्या खेडूताने त्याच्या सुरईमध्ये थोडं गवत घातलं. त्यामुळे बादशहाची पाणी पिण्याची गती मंदावली. बादशहाने त्याला विचारलं, असं का केलंस ? तर तो म्हणाला की माझे बैल शेतावरून थकून आले की असेच भसाभसा पाणी पितात. ते पोटासाठी चांगलं नसतं. म्हणून मी असंच गवत घालून पाणी देतो. शहाजहान खूष झाला. इतक्यात बादशहाचा लवाजमा आला तेव्हा खेडुताला हा कोणीतरी मोठा माणूस आहे हे कळलं. बादशाहने त्याची पाठ थोपटली, त्याला काही अश्रफी दिल्या आणि तो निघून गेला. बादशहा थोडा पुढे गेला तर त्याला एका झाडावर एक चिमणी एका ससाण्याच्या भोवती घिरट्या घालत चोच मारताना त्याने पाहिलं. त्याला वाटलं की ससाणा जखमी असेल, म्हणून त्याने आपल्या सेवकाला वर चढून बघायला सांगितलं. सेवक वर चढायला लागल्याबरोबर ससाणा आणि चिमणी दोघेही उडून गेले. सगळेच या प्रसंगाने थक्क झाले. बादशहाचा एक अधिकारी म्हणाला, हुजूर, या दिल्लीचं पाणी काही औरच आहे ! इथे चिमणीसुद्धा पिल्लाना वाचवण्यासाठी ससाण्याशी लढणारी आहे. बादशहाने सगळं ऐकून घेतलं आणि तो गप्प राहिला.

आग्र्याला पोचल्याबरोबर त्याने दिल्लीत किल्ला बांधायचा हुकूम सोडला. यासाठी त्याने शहजाहानाबाद नावाचं शहर वसवण्याचा निश्चय केला. यमुनेच्या काठी चंद्राकृती शहर निर्माण करायचं ठरलं. त्याला १२ छोटी प्रवेशद्वारं आणि एकेक छोटे बुरुज बांधले.. लाहोर आणि आग्र्याच्या दिशेने जाणारे दोन मुख्य दरवाजे बांधले.

मग किल्ल्यासाठी जागा शोधली. उत्तरेकडे पूर्वाभिमुख बांधायचा ठरलं. शहाजहानला तालकटोराजवळ किल्ला हवा होता.. त्या काळात उस्ताद हमीद आणि उस्ताद हिरा हे दोन नामांकित वास्तूशिल्पकार होते. त्यांना किल्ला बांधायचं काम सोपवलं गेलं. या दोघांनी तालकटोरा भागातील जमीन क्षारयुक्त आहे म्हणून नाकारली. त्यामुळे पायाचे दगड काही काळानंतर तडकतील आणि किल्ला हजार वर्षे टिकावा अशी इच्छा असेल तर ती जमीन योग्य नव्हती. शिवाय तलाव उन्हाळ्यात सुकला की पाण्याची सुद्धा कमतरता येणार होती. शेवटी यमुनेच्या काठावर सलीम गढजवळची जमीन नक्की केली.

जागा निश्चित झाल्यावर लगेच पाया खणायला सुरुवात झाली. धवलपूरहून लाल दगड आले. पाया खणून झाला आणि किल्ला बांधणारे दोन्ही उस्ताद गायब झाले. खूप शोधलं पण सापडेनात. शेवटी त्या दोघांना कैद करण्याचा हुकूम देण्यात आला. त्याबरोबर दोघे दरबारात हजर झाले. दोघांनी माफी मागत बादशाहाला म्हटलं की खणलेला खड्डा सोडून आम्ही एवढ्याचसाठी दूर निघून गेलो की या खड्ड्यावर सर्व ऋतूंचा मारा सहन केलेली जमीन तयार व्हावी, ज्यामुळे हा किल्ला शतकानुशतके मजबूत राहील. आता या जमिनीने उन्हाळ्यात प्रसारण पावणे, थंडीत आकुंचन पावणे आणि बरसातीत ओल राहणे सोसलंय. अल्लाने ठरवलं तर हा किल्ला हजार वर्षे दिल्लीची शान बनून राहील. शहाजहानला पाणी पाजणाऱ्या त्या खेडूताप्रमाणेच या दोघांनीही बादशाहाच्या भीतीला बळी न पडता खरं खरं सांगितलं होत, म्हणून शहाजहान खूष झाला.

१२ मे, इ. स. १६३९ मध्ये बांधायला सुरु झालेला हा लाल किल्ला ६-४-४८ला ८ वर्षांनी पूर्ण झाला. किल्ल्याची जबाबदारी आधी इज्जत खान, मग अलीवर्दीखान याच्यावर आली. लाहोरला जाणाऱ्या रस्त्याला लाहोर दरवाजा, काबूलचा काबुली दरवाजा, काश्मीरकडे जाणारा काश्मिरी दरवाजा, असे किल्ल्याला 4 दरवाजे बनले. किल्ल्यासमोर यमुना नदीच्या काठापर्यंतची जागा हत्तींच्या झुंजीसाठी मोकळी ठेवण्यात आली. बादशहा त्याच्या सज्जातून ह्या झुंजी पाहत असे. जनानखान्यातील स्त्रिया जाळीमागे बसून झुंज पाहत.

या शहराचं नाव शहजाहानाबाद ठेवलं गेलं.

किल्ल्याला लागून १२ कमानींचा एक पूल सलीमगढच्या किल्ल्याशी जोडला होता.. यमुनेचं पाणी किल्ल्याजवळ उंचावरून वाहत नसल्यामुळे किल्ल्यातील बागांना पाणी पुरवठा करण्यासाठी दिल्लीहून ३०० मैलावरील सरहिन्द्पासून एक कालवा खणण्यात आला आणि किल्ल्यात त्याच पाणी खेळवलं गेलं. बागेमध्ये पाट खेळवले. त्यात सुंदर रंगीबेरंगी मासोळया सोडण्यात आल्या. एका सोन्याच्या तारेत एक माणिक आणि दोन बारीक मोती गुंफून ती तार या मासोळयाच्या डोक्याला बांधली जाई. किल्ला सजला. देशभरच्या राजांनी सुंदर वस्तू बादशाहाला सजावटीसाठी पाठवल्या.. किल्ल्यात जे नक्षीकाम भिंतींवर झालं त्यात माणिक रत्न जडवली गेली.

किल्ला तयार झाल्यावर, ज्योतिषांकडून शुभ मुहूर्त काढून बादशहा शहाजहान थाटामाटाने मोठ्या मिरवणुकीने प्रवेश करायला आला. त्यावेळी त्याचा लाडलामुलगा युवराज दाराशिकोह त्याच्यावर सोन्याचांदीची फुलं उधळत होता.

लाहोरी दरवाज्याच्या समोर एक " घुंगट की दिवार " नावाची भिंत आहे, जिथून १५ ऑगस्टला पंतप्रधान भाषण करतात. ही भिंत औरंजेबाने बांधली.

त्याचं कारण म्हणजे दरबारी लोक जेव्हा चांदणी चौकातून दरबारात जात तेव्हा दिवाण-ए-आमचं तख्त समोर असायचं आणि सर्वांना त्या तख्ताला मुजरा करण्यासाठी पालखीतून अलीकडे उतरून चालत त्यासमोरून जावं लागे. औरंगजेबाला अमीर उमरावांची ही अडचण कळली म्हणून त्याने ही भिंत बांधली. आग्र्याला कैदेत असलेल्या शहाजहानला जेव्हा ही बातमी कळली तेव्हा त्याने मुलाला पत्र लिहिलं, “ ऐ फर्जंद अर्जामंद, तुमने तो किलेको घुंगट निकाला. हम तुमसे खूष हुए ’’

पुढच्या काळात या दरवाजांपैकी काबुली आणि काश्मिरी दरवाजे इंग्रजांनी रस्ता बनवण्यासाठी तोडले. लाहोरी दरवाजा बहादूरशहा जफरने तोडला कारण त्याचा मौलाबक्ष नावाचा देखणा, थोराड, अंबारीसकट जाणारा हत्ती या दरवाज्यातून जाऊ शकत नव्हता. आजही तो किल्ला अनेक सत्तांतराच्या राजकीय घडामोडींचा साक्षीदार म्हणून अजून जगप्रसिध्द आहे.. .

S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S-S

# “ काका मला वाचवा.. . ”

**थोरल्या शाहूराजांनी बाळाजी-बाजीराऊ-नानासाहेब पेशव्यांच्या मदतीने तळपणार्या स्वराज्य सूर्याला तिथेच रोखून धरलं. त्यांच्या कैलासावासानंतर सूर्य मावळतीकडे निघाला. माधवराव पेशव्यांच्या निधनानंतर तर तो निस्तेज झाला. शाहूराजांचा वंशदिवा मिणमिणता झाला. आता तिन्हीसांजेची चाहूल लागली. आर्त कातरवेळ राज्यावर पसरली.. पेशवे नारायणरावांची “ काका मला वाचवा ” ही करूण, आर्त किंकाळी वाडाभर, राज्यभर घुमली. उदास सावल्यांनी राज्य झाकोळून टाकलं. स्वराज्याच्या घसरणीला सुरुवात झाली होती. सुमेरसिंगच्या एका फटक्याने ते घडवून आणलं होतं.**

दादासाहेब अस्वस्थपणे शनिवारवाड्यातील आपल्या महालात फेऱ्या मारत होते. देव्या हुजऱ्या त्यांची घालमेल निर्विकारपणे पाहत होता.. मालकांचा काही भरोसा नाही.. कोणत्या क्षणी कच खातील, दगड पाझरायला लागेल आणि जमवून आणलेला बेत स्वत:च्याच हातांनी उधळून टाकतील याची त्याला शाश्वती नव्हती.. माणूस एकदम कच्च्या दिलाचा.. तो मनाशी म्हणाला.. गणेशोत्सवाचे दिवस.. दुपारची वेळ.. दिंडी दरवाजावर सुमेरसिंग आणि महंमद इसाफ ७००/८०० गारदी घेऊन दरवाज्यावर आले. गारद्यांचा चढलेला आवाज आणि गलका ऐकू आला, बुधासिंग जमादार त्यांना अडवत होता, त्याचाही चढलेला आवाज

शनिवारवाड्याच्या बुरुज-गणेश महाल-कचेरीच्या भिंतींवर आदळत होता.. . केव्हापासून पाय चेपून घेत बसलेले दादासाहेब ताडकन उठले आणि नुसत्या फेऱ्याच मारत बसले. मनाशी योजलेली घटका जवळ आली होती.. बाळाजी विश्वनाथांचे नातू, बाजीरावांचे धाकटे चिरंजीव, नानासाहेब पेशव्यांचे धाकटे बंधू, अटकेपार झेंडा लावून आलेले दादा, आज मात्र जोरदार सुटलेल्या वाऱ्यात पान हेलकावावं तसे दिसत होते. नारायणराव पेशवे झाल्यापासून दोघांच्यात बिघाड होऊ लागला होता. कारभारी, सरदारही पेशव्यांच्या मनमानी, चंचल, राजकारणाची कुवत नसलेल्या कारभाराला कंटाळले होते. नारायणराव पेशव्यांना अटक करून दादासाहेबांनी कारभार हाती घेण्याचा विचार कारभाऱ्यांच्या मनात मूळ धरू लागला होता. दादांचे कान त्या आवाजाचा वेध घेत होते.. लोकांचा गलका महालाच्या जवळजवळ सरकत होता.

आणि ते गर्रकन वळले. दारात २० वर्षाचा कोवळा नारायण पेशवा उभा होता.. ओठ थरथरत होते, पांढराफटक चेहरा घामाने भिजला होता.. कानातली भिकबाळी गदागदा हलत होती.. हातपाय कांपत होते.. नारायणाने दोन्ही हातांनी दादांच्या पायाला मिठी घातली.. त्याच्या डोळयात हजारो आर्जवांचे अश्रू गळत होते.. काका मला वाचवा, मला कैदेत टाका, मला हे पद नको, मला राज्य नको, सर्व तुम्हीच घ्या.. पण मला वाचवा. नारायणाने दादासाहेबांच्या पायाला मिठी मारली..

राघोबादादा थिजल्यासारखे उभे राहिले.. त्यांनी दाराकडे पाहिलं.. शनिवार वाड्यातील दासी-बटकी-गारदी-शागीर्द भेदरलेल्या चेहऱ्याने उभे होते.. त्यांच्यामागे दारात दोन अदृश्य चेहरे त्यांना दिसले.. रमा–माधव, सती जातांना रमाबाईंनी नारायणाचा हात आपल्या हातात देऊन म्हटलं होतं, याचं रक्षण करा,

प्राण सोडण्यापूर्वी माधवाने थेऊरच्या मंडपात वचन घेत म्हटलं होतं.. राज्य सांभाळा.. आणि तिथेच त्या दोघांजवळ राजलक्ष्मी हातात वरमाला घेऊन उभी होती.. कुणाकडे पाहू ? कुणाला निवडू.. राघोबादादांचा जीव कासावीस झाला.. आपली फंदफितुरी उघड झाल्यावर याच नारायणाने गेले चार महिने आपल्याला अटकेत ठेवलं होतं.. सखारामबापू आणि आपण मिळून नारायणाला अटकेत ठेवून पेशवाईचा कारभार हाती घ्यायचं कारस्थान ठरवलं होतं.. आता नारायणाला अटक करण्याची वेळ आली.. . हीच ती घडी, जिची आपण वाट पाहत होतो..

इतक्यात रक्ताने माखलेल्या तलवारी घेतलेले सुमेरसिंग आणि इतर गारदी आत आले. दादांच्या पायाला मिठी घातलेल्या नारायणराव पेशव्यांना पाहत सुमेरसिंग भसाड्या आवाजात म्हणाला, त्यांना सोडा, नाहीतर दोघांचे जीव जातील.. दादासाहेबांनी सुमेरसिंगला दूर होण्यास सांगितलं. त्यावर सुमेरसिंग म्हणाला, सापाला दुखावून सोडलं तर तो आमचाच जीव घेईल. रावांना सोडून द्या.. त्याबरोबर राघोबादादांनी नारायणाला दूर लोटलं. तुळया पवार गारद्यांच्याबरोबर होताच.. त्यानेच तर या कटात पुढाकार घेतला होता. त्याने नारायणरावांचे पाय मागे ओढले, त्याबरोबर त्यांची पायाची मिठी सुटली.. सुमेरसिंगने वार टाकला. आपल्या धन्याला वाचवण्यासाठी वाड्यावरचा गवई नारोबा फाटक आणि हुजऱ्या चापाजी टिळेकर पुढे झाले, त्यांनाही सुमेरसिंगने कापून काढलं. राघोबादादांच्या हाताला आणि डोक्याला हलकीशी जखम झाली. पागोट्याचे मोती तुटले. हे काय झालं? जासूदांचा जमादार नारोजी नाईक यांनी दादासाहेबांना बोल लावायला सुरुवात केली तर नारोजीलाही ठार केलं. सगळेच भांबावले.. हे तर आपण योजलंचं नव्हतं.. राघोबदादांच्या दिवाणखान्यात तीन प्रेतं पडली होती. पेशव्यांना अटक करायचं ठरलं होतं, तर सुमेरसिंगाने अचानक हे कृष्णकृत्य केलं..

३० ऑगस्ट सोमवार, अशुभाचं सावट सकाळपासूनच शनिवारवाड्यावर घिरट्या घालत होतं.. शनिवार वाड्यात गणपती उत्सव चालू होता. सरदार रघुजी आंग्रे पर्वतीच्या पायथ्याशी उतरले होते.. नारायणराव पेशवे त्यांना भेटायला सकाळी गेले तेव्हा राघूजींनी पेशव्यांना सावध राहण्यास सांगितलं.. काहीतरी पुण्यात कारस्थान शिजतंय याची त्यांना कुणकुण लागली होती. तिथून पर्वतीवर पेशवे जेवावयास गेले. केशरभाताचं जेवण करून झोपण्यासाठी वाड्यावर आले. इकडे वाड्यावर गारदी जमले.. तुळया पवारला पेशव्यांना अटक करायचं कारस्थान फुटेल याची भीती वाटली, म्हणून त्याने सुमेरसिंगला घाई करा अशी सूचना केली.

महंमद इसाफ आणि सुमेर सिंग वाड्यावर आले. त्यांना अडवणाऱ्या बुधासिंग जमादाराला कापून काढलं. दरवाजा लावण्यास पुढे आलेल्या आबाजीपंतानाही कापून काढलं. गारदी चौकात येऊन पगार मागू लागले तेव्हा इच्छापंत ढेरे गारद्यांना दमात घेऊ लागले, आणि सरकार झोपले आहेत, कचेरीत पगार मागा म्हणाले. तेव्हा गारदी त्यांच्याही अंगावर धावून गेले. इच्छारामपंत तिथल्या गायीच्या मागे लपले तर गाय आणि ढेरे दोघांचेही तुकडे केले. सगळे मग नारायणराव पेशव्यांच्या महालाकडे निघाले.

नारायणराव झोपले होते. हुजऱ्या चापाजीने त्यांना उठवलं, गारदी येत आहेत, आपण नानाच्या वाड्यात पळून जाऊ असं सांगितलं. पण पेशव्यांना हे कळताच ते मागच्या जिन्याने पार्वतीबाईंच्या महालात शिरले. त्या म्हणाल्या, हे सगळं करणं तुमच्या काकांचं आहे. त्यांच्याकडेच जा! वाड्यात सदाशिवभाऊंची पत्नी पार्वतीबाई, राघोबांची पत्नी आनंदीबाई, आणि नारायणरावांची पत्नी गंगाबाई होत्या. वाड्यात हलकल्लोळ माजला. शनिवारवाड्याचे दरवाजे बंद केलेले होते. गावात हा गहजब कळला. दाराशी सखाराम बापू बोकील, हरिपंत फडके,

असे दरबारी जमले. तोफा लावून दरवाजा फोडावा तर आत स्त्रिया होत्या. काहीतरी भयंकर घडलंय एवढं मात्र लक्षात आलं.

गारद्यांनी राघोबादादासाहेबांना खालच्या चौकात आणून बसवलं. १०० गारदी त्यांच्या भोवती उभे राहिले. दुश्मन मारला, आमची ख़ुशी करावी म्हणाले. बाकी गारद्यांनी सोनं-चांदी-लुटून वाडा साफ केला. वाड्यात रडारड माजली. इतक्यात आतून दरवाजा उघडला आणि राघोबादादांचा जासूद चिठ्ठी घेऊन बाहेर आला. चिठ्ठीत लिहिलं होतं, गुंता उरकला, आत यावं. बोकील, भवानराव प्रतिनिधी, घोरपडे, सारेच आत आले. जे काही घडलं होतं, ते पाहून सुन्न झाले. सर्वांनी दादांचा निषेध केला.. हे काय करून बसलात म्हणाले.. सखारामबापू म्हणाले, आमच्या मनास समाधान नाही.. मरण येईल तर बरं या भावनेने घरी गेले चैन पडेना तेव्हा बाहेर पडले, वेड्यासारखे हिंडत राहिले आणि रात्री घरी आले.. बापूंच मन करपून गेलं. काय योजलं होतं, काय झालं.. नियतीने महाराष्ट्राला कलंक लावला. मोगलाईत भावांना संपवून तख्त काबीज करण्याची पद्धत. त्रास देणाऱ्याला सत्ताधीश कैदेत ठेवतातच, राजकारणाला ते काही नवं नाही.. पण खून होणं अतर्क्याच्या पलीकडील..

तिन्हीसांजेची वेळ उतरली. सूर्य कलला, नव्हे राज्याचं भाग्यच मावळतीला आलं. शनिवारवाड्याच्या दगडी भिंतींमध्ये अंधार लौकर पसरला. पेशव्यांच्या दहनाची तयारी सुरु झाली.. मशालीच्या उजेडात मृतदेहांचा शोध सुरु झाला. केशरभात बाहेर पडलेलं एक शव दिसलं.. पेशव्यांचाच तो देह.. सकाळी खाल्ला होता त्यांनी तो प्रसाद.. गंगाबाई सती जाण्याचा हट्ट धरून बसल्या.. पण त्या गर्भवती होत्या. आजवर गर्भ टिकत नव्हता.. आता एक महिना उलटून गेला होता. सती जाऊ नये म्हणूनच आनंदीबाईंनी त्यांना खोलीत कोंडून ठेवलं.

रात्री त्रिंबकमामा पेठे यांनी नारायणरावांवर नडगेमोडीला अग्निसंस्कार केले.. १० ऑगस्ट १७५५ साली जन्मलेला हा गोपिकाबाईंचा पुत्र ३० ऑगस्ट १७७३ या दिवशी परलोकाला गेला. दुसरे दिवशी ३१ ऑगस्ट या दिवशी अनंत चतुर्दशी होती. पण प्रयाण करण्यापूर्वी त्या विघ्नहर्त्याने स्वराज्यावर एक संकट घालून ठेवलं होतं.

सुमेरसिंगचा एक तलवारीचा घाव मराठ्यांच्या राजकारणाची दिशा बदलून गेला. राघोबादादांनी गारद्यांना नारायणरावांना अटक करण्याची चिठ्ठी लिहून दिली. पण ४ दिवसांनी चिठ्ठी सापडली तेव्हा त्यात " धरावे "च्या ठिकाणी खोडून " मारावे '' लिहिलेलं होतं. गुन्ह्याचा तपास करणाऱ्या न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभूणे यांनी ती चिठ्ठी पहिली. खुनाचा आळ आनंदीबाईवर गेला. पण गारद्यानी त्यांचं नाव जबानीत घेतलं नाही.. कोणताही पुरावा त्यांच्याविरुध्द सापडला नाही. आनंदीबाईनी नानांना पत्र लिहून, आम्हास का दोषी धरता अशी वारंवार विचारणा केली, पण नाना फडणीसांना उत्तर देता आलं नाही. त्या उगीच बदनाम झाल्या.. या कारस्थानाची कल्पना हरिपंत फडके, त्रिंबक मामा पेठे आणि नाना फडणीस या तिघांना सोडून सर्वांना होती.. पण कुणी केला " ध चा मा " ते इतिहासाच्या पोटात अज्ञातच राहिलं. गाडद्यांचं मन तुळया पवारने फितवलं. पैसा ओतला की ते काहीही कामाला तयार होतील ही बुद्धी पवारची. त्याप्रमाणे राघोबादादांना कैदेतून मोकळं करायचं आणि पेशव्यांना अटक करण्याच्या कामाचे ३ लाख रुपये देण्याचा करार झाला. एकूण १३ गारदी कटात सामील होते. तपास पूर्ण होण्याला २ महिने लागले. अपराध्यांना देहांत शिक्षा झाली. राघोबादादानाही रामशास्त्रीनी देहांत प्रायश्चित्त ही एकच सजा असल्याचं सुनावलं, आणि ते नोकरी सोडून काशीला निघून गेले.

पुत्रशोकाने गोपिकाबाईंचं हृदय फुटून गेलं. मोठा पुत्र माधवराव पेशव्यांच्या जाण्याला अवघे ९ महिने झाले होते. तो आजारीच होता. पण पुत्रवियोगाचा हा दुसरा घाव अनपेक्षित होता. दु:खी गोपिकाबाई पंचवटीत जाऊन राहिल्या. ५ घरची भिक्षा मागून उदरभरण करत राहिल्या. शनिवारवाड्यात पेशवे घराण्यात भावाभावांचा पाठोपाठ ६/८ महिन्यात कैलासवास होण्याची अशुभ प्रथा चालूच राहिली.. बाजीराव-चिमणाजीअप्पा, नानासाहेब पेशवे-सदशिव भाऊ, गोपिकाबाईंचा विश्वासराव आणि मस्तानीचा मुलगा समशेरबहाद्दर, आणि आता माधवराव पेशवा- नारायणराव पेशवा.


नियती मराठ्यांचं राज्य संपवण्याच्या तयारीला लागली होती.. नियती एवढ्याचसाठी म्हणायचं की एकीकडे उतरणीला लावलेल्या स्वराज्याचा पुढचा पेशवाही तिने तिथेच ठरवून दिला. सती जाण्यासाठी रडणाऱ्या गंगाबाईंना, त्या गर्भवती आहेत म्हणून सती जाऊ शकत नाहीत हे आनंदीबाईंनी उच्चारलेले शब्द नारायणरावांच्या शवाभोवती जमलेल्या मुत्सद्यांनी ऐकले. लवकरच राघोबादादांना काढून टाकण्यासारखी वेळ आली. तेव्हा गोपिकाबाई, पार्वतीबाई, दरबारातील मुख्य पटवर्धन, त्रिंबकमामा पेठे, साबाजी भोसले, नाना फडणीस, रास्ते, पुरंदरे, यांनी गुप्त हालचाली सुरु केल्या. सखारामबापू बोकील यांनीच यात पुढाकार घेतला. तेच बारभाई. त्यांनी पेशव्यांची पत्नी गंगाबाई यांना पुरंदर किल्ल्यावर नेऊन त्यांच्या जीवाचं रक्षण केलं. गंगाबाईंना १८ एप्रिलला मुलगा झाला. त्याचं नाव सवाई माधवराव ठेवलं. आणि त्याच्या नावाने ४० दिवसांच्यानंतर पेशवाईची वस्त्रे आणवली. नाना फडणीस आणि सखारामबापू बोकील राज्य सांभाळू लागले.

पेशव्यांच्या मृत्यूनंतर ऑक्टोबरमध्ये राघोबादादांनी पेशवेपद स्वीकारलं. आणि एप्रिलमध्ये राघोबादादांचा ६ महिन्यांचा अधिकार संपला.

राघोबादादाही त्यानंतर जीव वाचवण्यासाठी पळतच राहिले आणि इंग्रजांच्या आश्रयाला गेले.

राघोबादादांना राजलक्ष्मी नाहीच प्रसन्न झाली.. सगळे तिचेच खेळ..

ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ



# गोष्टी सांगेन युक्तीच्या चार.

**महाभारतातील कौरव पांडव यांच्यातील युध्द हे भारतीय इतिहासात गाजलेलं पहिलं महायुध्द. कुरुक्षेत्रावरील पहिलं युध्द. त्यानंतर या भूमीवर सत्तांतर घडवणारी, इतिहास निर्माण करणारी खूप युद्धं खेळली गेली. ती सर्व अफगाणी, तुर्कांच्या, मंगोलांच्या आक्रमणामुळे घडली. "पानिपत " झालेल्या अनेक लढाया झाल्या. महाभारतातील युध्द हेही एका अफगाण्याने घडवलेलं युध्द. शकुनी त्याचं नाव.. पण तेव्हा गांधार हा मुसलमानांचा देश नव्हता. तेव्हापासून पुढे भारतीयांच्या मानसिकतेमध्ये काहीही फरक झाला नाही. परक्यांनी आपल्या देशात यायचं, भावाभावांमध्ये भांडणं लावायची आणि राज्यं बळकवायची ही परंपरा चालूच राहिली. शकुनीने तेच केलं.**

कृष्णाने वचनच दिलं होतं पांडवांना तसं. अज्ञातवासातून यशस्वी होऊन परतल्यानंतर ५ गावं, इंद्रपत, पानिपत, तिलपत, सोनपत, आणि बागपत पण मिळाली नाहीत, कृष्णाची मध्यस्थीही यशस्वी झाली नाही, शेवटी युध्द हाच मार्ग राहिला. कृष्णाची फौज दुर्योधनाने घेतली आणि श्रीकृष्ण अर्जुनाच्या रथाचं सारथ्य करायला उभे राहिले. हातात शस्त्र न धरता, युध्द संपेपर्यंत पांडवांची रक्षा करायची जबाबदारी श्रीकृष्णाने स्वीकारली.

दुसरीकडे, दुर्योधनाच्या दरबारात, जोपर्यंत

कृष्ण उभा आहे, तोपर्यंत तुम्हाला जय मिळणं अशक्य आहे असं भीष्मांनी दुर्योधनाला स्पष्ट सांगितलं. त्यावर दुर्योधनाला पाठिंबा देणाऱ्या कर्णाने प्रतिज्ञा केली की जोपर्यंत भीष्म मैदानात आहेत, तोवर मी लढणार नाही. भीष्मांनी २ अटी घातल्या. 1. एकतर मी नाहीतर कर्ण सेनापती होईल. मग दुर्योधनाने भीष्मांना सेनापती केलं. दुसरं, पांडवांना ठार करणं जमलं नाही तरी मी रोज १०,००० सैनिक मारून मी पांडवांचा नाश करीन.

स्मशान, देवळे, पवित्र स्थळे, आश्रम सोडून, पुष्य नक्षत्रावर कुरुक्षेत्राच्या सपाट मैदानावर हिरणवती नदीच्या एका तीरावर कौरवांची फौज जमली. दुसऱ्या काठावर पांडवांची छावणी झाली. आपापल्या फौजेला खुणेचे शब्द, दागिने, गणवेश, बिल्ले, कपडे दिले गेले. कृष्णाचा गरुडध्वज, अर्जुनाचा नंदीघोष, भीष्मांचा गंगौघ, रथ युध्दभूमीवर हिंडायला लागले. सूर्योदयाबरोबर युद्धाला सुरुवात आणि सूर्यास्ताला युध्द थांबणार होतं. कृष्णाचा पांचजन्य शंख, भीष्मांचा गंगनाभ, धर्माचा अनंतविजय, अर्जुनाचा देवदत्त, भीमाचा पौंड्र, नकुलाचा सुघोष, आणि सहदेवाचा मणिपुष्पक, धृष्टद्युम्नाचा यज्ञदत्त समरांगणावर वाजला की दोन्हीकडील सेनेला इशारा होऊन युद्धाला सुरुवात होणार होती. १८ अक्षौहिणी सेना जमली. कौरवांची ११ अक्षौहिणी आणि पांडवांची ७ अक्षौहिणी.

पहिले ७ दिवस घनघोर युध्द झालं. दुर्योधनाचे ४० भाऊ, विराटपुत्र, शल्याचा पुत्र असे अनेक रथी महारथी वीरगती पावले. अर्जुन भीष्म यांच्यात पराक्रमी युध्द झालं. पण त्या रात्री, दुर्योधनाने भीष्मांना दोष दिला की ते पांडवांशी ममतेने वागत आहेत. तेव्हा भीष्मांनी प्रतिज्ञा केली की उद्या कृष्णाला

शस्त्र हाती घ्यायला लागेल एवढा पराक्रम करीन, पण ते झालं नाही. ९ व्या दिवशी भीष्मांनी, अर्जुनाला ठार करीन अशी प्रतिज्ञा केली.

१० व्या दिवसापासून कृष्णाची कूट बुद्धी सुरु झाली.

**१.** लढाई संपल्यावर रोज रात्री कृष्णाच्या तंबूत सर्वांची सभा भरत होती. गुप्तहेरांनी भीष्मांची प्रतिज्ञा कृष्णाकडे आणली. आता कृष्णाच्या युक्ती सांगण्याला सुरुवात झाली. त्यांनी, द्रौपदीला चेहरा झाकेल असा पदर ओढून भीष्मांच्या भेटीला जायला सांगितलं. द्रौपदी भीष्मांच्या तंबूत गेली आणि त्यांना वंदन केलं. तिला न ओळखल्यामुळे भीष्मांनी आशीर्वाद दिला, '' सौभाग्यवती भव.'' तेव्हा द्रौपदी म्हणाली, " आपण तर माझ्या पतींना मारण्याची प्रतिज्ञा केली आहेत. '' तेव्हा भीष्माचार्य म्हणाले की, मी माझी प्रतिज्ञा मोडणार नाही, पण तुझा आशीर्वादही खोटा ठरवणार नाही. म्हणून शिखंडीला अर्जुनाच्या पुढे रथावर उभं करा. मी स्त्रीवर बाण मारत नाही. ती आधी स्त्री आणि मग पुरुष झाली आहे. त्यामुळे तिच्यामागे उभा राहिलेला अर्जुन वाचेल.

१० वा दिवस उजाडला. कुरुक्षेत्रावर अर्जुनाच्या रथावर अर्जुन, श्रीकृष्ण आणि शिखंडी उभे राहिले. बाणांचा वर्षाव सुरु झाला. शिखंडीने पुढे उभे राहून भीष्मांचा सारथी मारला. भीष्मांनी वेगवेगळया आकाराचे बाण मारले, तेव्हा कृष्णाने रथ अधांतरी उचलला. हे नैपुण्य कृष्णाचं ! घोडे, रथात ठेवेलेलं धनुष्य बाणांचं भांडार, माणसांनी भरलेला, यासह उंच गेलेल्या रथामुळे भीष्मांना फक्त कृष्णच दिसला. शिखंडी आणि अर्जुन दिसलेच नाहीत. थक्क करणारं युध्द सैनिकांनी त्या दिवशी पाहिलं. सूर्यास्त जवळ आला तेव्हा अर्जुनाच्या बाणांनी भीष्माचार्य

घायाळ झाले. ५६ दिवसांनी उत्तरायण सुरु होईल तेव्हा प्राण सोडायच्या निश्चयाने बाणांवर-शरपंजरी भीष्म पडून राहिले.

**२.** ११ वा दिवस उजाडला. १०व्या रात्री गुप्तहेरांनी बातमी आणली होती की की भीष्म पडले, उद्या कर्ण रणांगणात उतरणार.. द्रोणाचार्य सेनापती झाले आहेत. आता कर्णाची ताकद कमी करणं हा महत्वाचा प्रश्न झाला. कृष्णाने कुंतीला सांगितलं की उद्या सकाळी नदीवर जा. कर्ण रोज तिथे सूर्योपासना करायला येतो. त्याला पांडव हे तुझे भाऊ आहेत, त्यांना मारू नकोस अशी विनवणी कर. त्याप्रमाणे कुंती कर्णाच्या स्नानाच्या वेळी तिथे पोचली. आणि तू माझाच मुलगा आहेस, पांडवांना मारू नकोस, अशी विनंती केली. तेव्हा अर्जुनाला सोडून बाकीच्यांना अभय आहे असं वचन कर्णाने दिलं. ४ पांडव भावांचे तरी प्राण वाचले. त्याच रात्री दुर्योधनाने धर्माला जिवंत पकडून आणण्याची कामगिरी द्रोणांना सांगितली होती..

**३.** १२ वा दिवस.. धर्माच्या रक्षणासाठी भीम आणि अर्जुन द्रोणांच्या समोर आले. भीम द्रोणाचार्यावर गेला आणि नरकासुराचा पुत्र भगदत्त हा धर्माला मारायला आला तेव्हा त्याच्या जाडजाड भुवयांवर बांधलेली पट्टी कृष्णाने अर्जुनाला तोडायला सांगितली. अर्जुनाच्या बाणाने भगदत्ताच्या कपाळावरची पट्टी घसरली आणि डोळ्यावर आल्यामुळे त्याला दिसेनासं झालं. भगदत्त पळून गेला. धर्म वाचला.

**४.** १३ वा दिवस चक्रव्यूहाचा होता. अभिमन्यूला कृष्णाने व्यूह कसा भेदायचा ते आदल्या रात्री समजावून सांगितलं होतं. चक्रव्युहात दुर्योधन पुत्र लक्ष्मण आणि अभिमन्युचं गदायुध्द झालं, त्यात दोघेही बेशुध्द झाले. पण लक्ष्मण आधी शुद्धीवर आला आणि त्याने अभिमन्युला ठार केलं. तेव्हा त्याचं शव जयद्रथाने

लाथ मारून सरळ केलं. हे पाहून संतापलेल्या अर्जुनाने तिथेच, उद्याच्या सूर्यास्ताच्या आधी जयद्रथाला ठार करीन, नाहीतर प्राणत्याग करीन अशी प्रतिज्ञा केली. त्या रात्रीच्या सभेत अर्जुनाच्या या आततायी वागण्यावर कृष्णाने त्याला खूप दोष दिला.

**५.** १४ वा दिवस.. कौरवांनी जयद्रथाला लपवून ठेवलं. दिवसभर खूप शोधूनही अर्जुनाला जयद्रथ सापडला नाही, तेव्हा सूर्यास्ताला त्याने अग्नीप्रवेशासाठी चिता रचली. अर्जुन चितेत शिरणार म्हणून जयद्रथ मजा पाहायला समोर आला. पण अचानक सूर्याभोवतीचे ढग बाजूला झाले आणि सूर्य अजून वरच आहे हे सर्वांनी पाहिलं. त्याक्षणी सरणावरूनच अर्जुनाने जयद्रथावर बाण मारून त्याला ठार केलं. त्यादिवशी कृष्णाने रासायनिक ढग निर्माण करून सूर्यास्तासारखा अंधार केला होता. जयद्रथाला पाहिल्यावर ते आवरण दूर केलं. त्याच दिवशी कर्ण आणि घटोत्कचा मध्ये युध्द झालं होतं. त्या भीषण युद्धात कर्णाने पांडवांसाठी राखून ठेवलेलं वैजयंती अस्त्र घटोत्कचाला मारून संपवलं. आता त्या अस्त्राची पांडवांना भीती उरली नव्हती. घटोत्कच मरता मरता अनेकांना मारून जमिनीवर पडला.

त्या रात्री दुसरे दिवशीची रणनीती ठरवायला सभा झाली. कृष्णाने भीमाला काम सांगितलं, की उद्या सकाळी मालवराजा इंद्रवार्माचा अश्वत्थामा नावाचा हत्ती मारायचा, अश्वथामा मेला एवढीच बातमी पसरवायची आणि द्रोणाने विचारलं की धर्माने फक्त '' नरो वा कुंजरोवा '' म्हणायचं..

**६.** १५ वा दिवस.. सकाळी युद्धाला सुरुवात झाली भीमाने अश्वत्थामा हत्ती मारला आणि ही बातमी पसरवली. आपला मुलगा अश्वत्थामा मरण पावला की काय या भीतीने द्रोणाचार्य खरं बोलणाऱ्या धर्माकडे खात्री करून घ्यायला आले,

तेव्हा धर्म पुटपुटला, की माणूस की हत्ती ते माहीत नाही. नरो वा कुंजरोवा.. द्रोणाचार्य खचले आणि रथात बसले तेव्हा द्रुपदपुत्राने त्यांचं मस्तक उडवलं आणि द्रोणाचार्यांना ठार केलं. कौरवांची शक्ती आणखी क्षीण झाली.

आता कर्ण कौरवांचा सेनापती झाला. उद्या कर्ण आणि अर्जुन यांचं युध्द अटळ होतं. गुप्तहेरांनी बातमी आणली की नकुल सहदेवाचा मामा शल्य सारथी होणार. कर्णाची ताकद कमी करणं जरूर होतं. श्रीकृष्णाने सहदेवावर कामगिरी सोपवली की रात्रीच शल्यमामाला भेटायचं आणि उद्या युद्धाच्यावेळी त्याचा अपमान होईल असं, सूतपुत्र, दुर्योधनाचा आश्रित असं काहीतरी बोलायचं. म्हणजे मानभंग होऊन त्याचा मानसिक तोल बिघडेल. सहदेवाने ती कामगिरी चोख बजावली.

१६ व्या दिवशी कर्ण आणि अर्जुनात अनिर्णित असं तुंबळ युध्द झालं. कर्णाचा सारथी सत्यासेन ठार झाला. लढाई मूळ जागेपासून दूर ३ कोसांवर आली.

**७.** १७ वा दिवस.. आजच्या दिवशी भीमाने दु:शासनाला मुष्टी युद्धात ठार केलं. ज्या हातांनी द्रौपदीचे केस त्याने ओढले होते, त्याच्या रक्ताने भरलेल्या हातांनी भीमाने द्रौपदीचे केस परत बांधले. तोपर्यंत द्रौपदीने केस मोकळे ठेवले होते. दुसरीकडे कृष्णाने आज कर्णाला जिथे दलदल होती, तिथे नेलं. दोघांच्यात भारी संग्राम झाला. पण जसजसा सूर्य वरती यायला लागला, तशी दलदल कोरडी व्हायला लागली आणि कर्णाच्या रथाभोवतीची माती घट्ट झाली. कर्णाच्या रथाचं चाक जमिनीत रुतलं. अर्जुनाने बाणांचा मारा चालूच ठेवला, तेव्हा शस्त्र नसलेल्यावर शस्त्र टाकणं हा युद्धाचा धर्म नव्हे असं कर्ण म्हणाला, त्यावेळी '' तेव्हा तुझा कुठे गेला होता धर्म ? असं म्हणत अर्जुनाला कृष्णाने अंजलिक बाण सोडायला

सांगितलं. कर्ण जमिनीवर कोसळला. मरतांना त्याने कृष्णालाच त्याने आपले अंत्यसंस्कार करायला सांगितलं. पावन टेकडीवर त्याला कृष्णाने अग्नी दिला.

८ सर्व कौरव ठार झाले एकटा दुर्योधन जिवंत राहिला हे कळल्यावर गांधारीने त्याला निरोप पाठवला की जन्मल्यावेळी होतास तसा मला भेटायला ये. गुप्त हेरांकडून ही बातमी मिळाल्यावर कृष्ण सहज म्हणून त्याला भेटायला गेला आणि पूर्ण विवस्त्र न होता, केळीचं पान झाकून जा म्हणाला. दुर्योधन तसाच आईला भेटायला गेला, तेव्हा गांधारी म्हणाली की माझ्या पातिव्रत्याच्या सामर्थ्याने मी तुला माझ्या नजरेने वज्रदेही करणार आहे. आता तुझा झाकलेला देह तेवढा दुर्बल राहील, आणि इतर भाग वज्रदेही होईल. कृष्णाने तुला फसवलं, उद्या भीमाबरोबर लढाईत तुझा विजय निश्चित झाला असता. आता तुझं नशीब असं म्हणाली.

१८ वा. दिवस. यादिवशी दुर्योधन सूर्यकुंड तलावात लपून बसला. त्याला भीमाने द्वंद खेळायला बाहेर बोलावलं. नाहीतर पाणी विषारी करीन असं धमकावलं. लपलेला दुर्योधन बाहेर आला. पण त्याच्या वज्रदेहामुळे भीमाचे ठोसे वाया जाऊ लागले. श्रीकृष्णाचे इशारेही त्याला कळेनात, तेव्हा अर्जुनाने आपलं पितांबर बाजूला करून इथे वार कर असं सुचवलं. भीमाने केळीच्या पाने झाकलेल्या भागावर तडाखा मारला आणि दुर्योधन ठार झाला. पण मरतांना त्याने अश्वथाम्याला सेनापती केलं.

९. १८ दिवस चाललेलं युध्द संपलं. कौरवांचा नाश झाला. कृष्ण पांडवांना घेऊन धृतराष्ट्र आणि गांधारीला भेटायला गेला. त्यांना राजवाड्याच्या बागेत भीमाचा चेपलेला धातूचा पुतळा दिसला. दुर्योधनाने भीमाशी मुष्टीयुध्द लढण्याच्या सरावासाठी तो बनवला होता. कृष्णाने तो पुतळा बरोबर घेतला. महालात गेल्यावर धृतराष्ट्राने भीमाला आलिंगन द्यायची इच्छा दाखवली, भीम पुढे

व्हायला लागला तेव्हा त्याला अडवून कृष्णाने तो पुतळा अंध धृतराष्ट्रासमोर नेला. त्यामुळे राजाने पुतळयाला  जोरात आवळलं. भीमाला मारण्याचा त्याचा डाव फसला होता. मग सगळे गांधारीला भेटायला गेले. गांधारीने कृष्णाला शाप दिला की तूही असाच, व्याधाच्या बाणाने रानावनात एकाकी मरण पावशील. श्रीकृष्णाने तो शाप शांत मनाने स्वीकारला. माझा अंत होणार आहे हे मला माहीत आहे, म्हणाले.

आपल्या तळावर आल्यावर रात्री पांडवांना घेऊन कृष्ण नदीकाठावर गेला, तेव्हा अश्वथाम्याने द्रोणाचार्यांच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी पांडवांची छावणी गाठली. दारात कृष्णाने यंत्रमानव उभा केला होता ( रोबो ). अंदाजाने त्याने शिवस्तुती म्हटली. पुतळा बाजूला झाला. अश्वथाम्याने गाढ झोपलेल्या सर्व पांडवपुत्रांना कापून काढलं. अभिमन्यूची पत्नी उत्तरा हिच्या पोटातील गर्भावर ब्रह्मास्त्र टाकलं. हि बातमी कळल्याबरोबर श्रीकृष्ण आणि पांडव नदी तीरावरून धावत परतले. कृष्णाने त्या परिक्षीण झालेल्या गर्भावर मंत्र म्हणून त्याला जिवंत केलं. तोच जीव परिक्षित नावाने जगला आणि पांडवांचा वंश चालू राहिला. कुरुक्षेत्रावर शिल्लक राहिले मृत मानवी देह, धन्याबरोबर कोसळलेले जखमी अश्व, बाण घुसलेले हत्तींचे देह, त्यांच्या तुटलेल्या शुंड, रक्तमासांचा चिखल, सैनिकांचे तुटलेले मणिहार, बाजूबंद, बाणांचा खच, आणि अनेक विधवांचे, मातांचे-पित्यांचे, गांधारी-कुंती-द्रौपदीचे विलाप..

धर्म भावांसह हस्तिनापुरात आला. राज्य करायला लागला.

युध्द बुद्धी-शक्तीच्या जोरावर आणि गुप्तहेरांच्या कामगिरीवर जिंकलं जातं, त्याचं पाहिलं मोठं उदाहरण म्हणजे महा.. महा.. महाभारतीय युध्द.. .

**SS==SS==SS==SS==SS==SS==SS==SS**

# झाले बहू होतील बहू

**फादर ऑफ अनरेस्ट अशी ज्या इंग्रजांनी लोकमान्यांची नोंद करून ठेवली, ते बाळ गंगाधर टिळक म्हणजे साक्षात स्फुल्लिंग. हातपाय गाळणारे आणि रडणारे पुरुष पहिले की स्वातंत्र्य अजून खूप दूर आहे असं ते म्हणत. लोकनायक असा हवा की जो समाजाला दोन पावलं पुढे नेतो, स्वत: थांबतो आणि समाज आपल्या मागे येतो आहे की नाही ते पाहतो, अशी त्यांनी नेत्याची व्याख्या केली होती. आधी स्वराज्य मिळवायचं आणि मग आपल्या स्वतंत्र देशात अनिष्ट रिती रूढी बदलून सुधारणा घडवायच्या कारण समाज अत्यंत संथपणे विचार बदलतो, असं त्यांचं परखड मत होतं. शत्रूने आपली शस्त्रे बदलली की आपणही आपली बदलावी, दोन द्यावेत आणि दोन घ्यावेत हे त्यांचं राजकारणाचं सूत्र होतं. बालपणात, तरुण वयात ते होते तरी कसे ?**

झाले बहू होतील बहू, परी या सम हा.. लोकमान्य टिळक यांचं वर्णनही असंच करावं लागेल. थोर पुरुष खूप होऊन गेले, होतीलही, पण टिळकांसारखे कुणी नाही. वेद, संस्कृत, गणित, खगोलशास्त्र, भाषा, कायदे, वनस्पतीशास्त्र, आयुर्वेद, सर्वातच प्रकांड पांडित्य. भगवतगीतेचं अमृत प्यायल्यावर इतर संगीत सामान्य वाटतं असं म्हणत. एक शास्त्रीय संगीतातील त्यांना कळत नव्हतं म्हणावं तर नारायण राजहंसांचं गायन ऐकल्यावर त्यांना “ बालगंधर्व ” या नावाने अमर करणारे तेच.

चिखलीच्या गंगाधरपंतांच्या पत्नीने सूर्याची उपासना केली, सूर्य व्रत केलं आणि २३ जुलै, १८५६ या दिवशी जो सूर्यपुत्र रत्नागिरीत जन्मला तो पुत्र

म्हणजे बाळ गंगाधर टिळक. पाळण्यातलं नाव केशव पण आई बाळ म्हणायची म्हणून या स्वयंभू पुत्राने बाळ हेच नाव आजन्म धारण केलं. प्रखर बुद्धी घेऊन आलेल्या या आपल्या चिरंजीवाला गंगाधरपंतांनी ८ वर्षापर्यंत पहाटे उठवून संस्कृतमधलं जे जे शिकवलं ते एकपाठी मुलाने लगेच पाठ केलं. त्यांची गणितातील बुद्धी तर चकित करणारी होती. गंगाधरपंत शाळेत शिक्षक होते. मोठ्या वर्गातील मुलं सोडवता न येण्यासारखी गणितं घेऊन यायचे, ती गणितं बाळच सोडवायचा. मोठेपणी देशोदेशीचे गणिती आपली न सुटलेली कोडी घेऊ येत. सत्यासाठी लढा हा नंतरच्या काळात लोकांना दिसलेला गुण. पण हे पाणी लहानपणापासूनच अंगात होतं. स. १८६४ मध्ये लोकमान्यांची आई, पार्वतीबाई वारल्या.. इ. स. १८६६ मध्ये गंगाधरपंत पुणे जिल्ह्याचे असिस्टंट डेप्युटी शिक्षण अधिकारी झाले आणि रत्नागिरी सोडून दोघे पुण्यात आले.

गंगाधरपंतानी त्यांना पत्र्यामारुतीजवळच्या २ नंबरच्या शाळेत घातलं. अंगात बाराबंदी, पंचा आणि लांब, पांढरी, गोंड्याची टोपी असं त्यांचा पोशाख असे. तुळशी बागेजवळ दातारांच्या वाड्यात गंगाधरपंत राहू लागले. त्यांच्या शेजारी केरुनाना छत्रे राहत. केरुनानांनी त्यांना खगोलशास्त्रातील धडे आणि आकाश दर्शनाची ओळख करून दिली.

त्याकाळी इयत्ता पाचवीला इंग्रजी पहिली म्हणत. पहिली, दुसरी, असा क्रम होता. त्यांच्या शाळेचे हेडमास्तर नीलकंठशास्त्री साठे होते आणि firstफर्स्ट असिस्टंट नारायण विनायक जोशी होते. टिळक ७ वीत असतांनाची घटना आहे ही! एकदा सकाळी जोशी मास्तर आणि टिळक यांच्यात गणित कसं सोडवायचं यावरून कड्याकाचा वाद झाला. हा सातवीतला मुलगा तडक शाळा सोडून तेव्हाचे मोठे गणिती केरुनाना छत्रे यांच्याकडे गेला. पाठोपाठ जोशी मास्तर ही गेले. आणि शहानिशा करून आले. केरोपंत तेव्हा डेक्कन कॉलेज मध्ये गणिताचे प्राध्यापक होते. पुण्यातील शाळेतील शिक्षकांचं शिकवणं पटलं नाही तेव्हा ती शाळा सोडून दुसऱ्या

शाळेत गेले. आणि त्या शिक्षकाची बदली झाल्यावर परत त्या शाळेत आले. शाळेत विद्यार्थी असल्यापासून हे तेज होतं. कॉलेजमध्ये असताना एका प्रोफेसरला गणित शिकवणं जमत नव्हतं, तेव्हा दुसऱ्या प्रोफेसरांना पाठवावं असं अर्ज सर्व विद्यार्थ्यांनी केला. त्यात पहिली सही कुणी केली हे कळू नये म्हणून सर्व विद्यार्थ्यांनी गोलाकार सह्या करण्याचा सल्ला लोकमान्यांनी दिला.

कॉलेजमध्ये आले तेव्हा त्यांचं शरीर अगदी बारीक, डोकं मोठं, हातापायाच्या काड्या असं होतं. शरीर सुधारायचं त्यांच्या मनाने घेतलं आणि मग रोज २०० जोर बैठका, पोहणं, पाण्यावर तरंगत असतांनाच भाकरी खाणं, दूर चालायला जाणं यांनी त्यांच्या प्रचंड फरक पडला. एवढंच करून ते थांबले नाहीत. पुण्यातील थंडीच्या दिवसांमध्ये मलमलचे कपडे आणि उन्हाळयात स्वेटर घालून ते बसू लागले. स्नायूंची ही सहनशक्ती त्यांना मंडालेच्या ६ वर्षांच्या वास्तव्यात उपयोगी पडली. सुभाषचंद्र बोस एक महिना मंडालेमध्ये शिक्षा भोगत होते. प्रचंड उन्हाळयामुळे मला एक महिना असह्य झाला तर लोकमान्य ६ वर्षं कसे राहिले असतील असं त्यांनी स्वत:चं लिहून ठेवलंय..

तरुणपणी लोकमान्य कसे होते?

शालेय शिक्षण संपल्यावर लोकमान्य डेक्कन कॉलेजमध्ये असतांना होस्टेलवर राहत. गोपाल गणेश आगरकरही तिथेच शिकायला होते. जेवायच्या वेळी स्नान करून सोवळे नेसून जेवायला बसत. एक दिवस त्यांच्या मित्रांनी खोडी काढण्यासाठी त्यांचं सोवळे लपवून ठेवलं. मित्रांचा चावटपणा त्यांच्या लक्षात आला, पण काहीच घडलं नाही असं दाखवत ओल्या धोतरावरच ते जेवले. संध्याकाळी सगळी मुलं बाहेर फिरायला गेली. तेव्हा प्रत्येकाच्या खोलीत जाऊन आतून कडी लावली आणि लाकडी पार्टीशनवरून उड्या मारत सगळया खोल्या बंद केल्या. रात्री सर्व मित्र बाहेरून परतले, तेव्हा कुणालाच त्यांच्या खोल्यांमध्ये जाता

येईना. तेव्हा स्वत:च्या खोलीत बसलेले लोकमान्य हसत हसत बाहेर आले जरा थांबा, असं म्हणत सर्व खोल्या उघडून दिल्या. सर्व मित्रांना सकाळ आठवली. हिशेब बरोबरीत सुटला होता.

लोकमान्य डेक्कन कॉलेजमध्ये शिकत असतांना घडलेली ही घटना आहे. तरुण वय होतं. लोकमान्य आपल्या मित्रांबरोबर कॉलेजच्या गच्चीवर गप्पा मारत बसले होते. गप्पा मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमावर सुरु झाल्या. मर्दानी आवेशावर सगळेच तावातावाने बोलायला लागले. तेव्हा विषय निघाला की आत्ता या ठिकाणाहून नाहीसे व्हायची वेळ आलं तर कोण काय करेल ? प्रत्येकाने आपापला मार्ग सांगितला. लोकमान्यांची वेळ आली तेव्हा ते उठले, “ मी असं करीन “ असं म्हणत त्यांनी धोतराचा काचा मारला आणि गच्चीच्या भिंतीवरून खाली उडी टाकली. सगळे मित्र आ वासून बघत राहिले आणि हातपाय मोडले असतील या अंदाजाने जिन्याकडे धावले. तेव्हा लोकमान्य आरामात जिना चढून वर येत होते. हे तर वय धाडस आणि धैर्य दाखवण्याचंचं होतं. वय साठीला पोचलं तरी ही जिगर कमी झाली नव्हती, हे भारतीयांना परत एकदा अनुभवायला मिळालं ते त्यांच्या इंग्लंडच्या प्रवासात. महायुद्धाचे दिवस होते. समुद्रात सुरुंग असण्याची भीती इंग्रजांना वाटत होती. जवळ जवळ २१ बोटींचा ताफा चाललेला होता.. लोकमान्यांची बोट मध्यभागी होती. पण सुरुंग लागला तर जीव वाचवायला लाईफ बोट सोडायची आणि वल्हवत दूर न्यायची असं त्या बोटीच्या कप्तानाने लोकांना सांगितलं. त्याबरोबर लोकमान्य पुढे झाले. त्यांनी स्वत:चं लाईफ बोट सोडली, उडी मारून त्यात ते उतरले आणि बोट वल्हवत दूर नेली आणि परत आले. एवढं करून ते थांबले नाहीत तर बरोबरीच्या लोकांकडून ते करूनही घेतलं.. त्यांच्या धाडसाला सीमाच नव्हती.

आगरकरांचं नाव टिळक या नावाशी जोडल्याशिवाय लोकमान्यांचं चरित्र पूर्णच होत नाही. दोघेही कॉलेजपासून एकत्र राहिले. दोघांनी राष्ट्रकार्याला


वाहून घेण्याच्या शपथाही एकत्र घेतल्या. मोठ्या पगाराच्या सरकारी नोकरयांचा मोह सोडून आगरकरांनी समाज सुधारणेच व्रत घेतलं आणि लोकमान्यांनी स्वतंत्र स्वराज्याचं व्रत हाती घेतलं. दोघांचे त्यावरून भरपूर वाद होतं. आगरकर म्हणत की आधी आपलं घर सुधारायला हवं. टिळक म्हणत की शत्रू दारात उभा असताना त्याला हाकलून लावण्याचं काम आधी हाती घ्यायला हवं म्हणजे स्वतंत्र भारतात आपण सामाजिक सुधारणा मनासारख्या घडवून आणू. सुधारणा आणि स्वातंत्र्य या दोन्ही आघाड्यांवर काम करण्याचं टिळकांनी नाकारलं कारण त्यामुळे मन द्विधा होतं आणि कोणताच काम पूर्णपणे जोरात पुढे जात नाही.

लोकमान्य लंडनला पोचले तेव्हा त्यांच्या बरोबरच्या लोकांना सगळीकडे हॉटेल्स डायनिंग हॉल, ब्रेड-बटर हॉटेलांची रेलचेल दिसली. इंग्लडमधले लोक काय बाहेरच खातात आणि झोपायला घरी जातात की काय असं एकजण म्हणाला तेव्हा लोकमान्य त्याला म्हणाले, इंग्रजांना हसायला नको. ही  वेळ आपल्याकडेही लौकरच येणार आहे. शिक्षण पद्धती त्यांच्यासारखी झाली, आणि एकदा आपल्या स्त्रिया शिकायला लागल्या आणि मिळवायला लागल्या की पुरुषांसारखे हक्क मागायला लागतील आणि ब्रेड बटरची हॉटेल्स आपल्याकडेही येणारच. फक्त आपली शिक्षण पद्धती आपल्या संस्कृतीला साजेशी असेल तरच हे होणार नाही. " बरोबर १०० वर्षांपूर्वीची ही घटना. आणि हे लोकमान्यांचं द्रष्टेपण. या इंग्लंडच्या मुक्कामात त्यांनी २५००० रुपयाला केसरीसाठी छपाईचं मशीन घेतलं. आणि त्यातील स्क्र्यू आणि स्क्र्यू त्यांनी अभ्यासाने शिकून घेतला. त्या मुक्कामात लंडनवरील ट्यूबवरील  सर्व स्टेशन्स, त्यावर धावणाऱ्या गाड्या आणि त्यांचं वेळापत्रक त्यांना पाठ झालं होतं. लोकांना त्याच खूप आश्चर्य वाटलं तेव्हा ते म्हणाले की कुठलंही काम हातात घेतलं की त्याचा पूर्ण अभ्यास करून टाकतो. एकदा त्यांना हृदयाची आणि डोळयांची माहिती करून घ्यावीशी वाटली तेव्हा त्यांनी बैलाचं हृदय आणि डोळे विकत आणले आणि होस्टेलच्या खोलीवर बसून

secत्यांची रचना पाहिली. स्मरणशक्ती तर अफाटच होती. बेळगावला १९०६ साली पाहिलेल्या १० वर्षाच्या मुलीला १९१८ साली ओळखलं. संदर्भ देऊन तुम्हाला मी पाहिलंय म्हणाले. सर्वांनाच ते लक्षात ठेवायचे.

त्यांचे राजकारणातील सर्व साथीदार त्यांच्याआधी स्वर्गवासी झाले तेव्हा ते म्हणाले, या सर्वांपेक्षा मी जास्त कठोर होतो म्हणूनच जास्त जगलो. स्वत:साठी शिक्षा भोगतांना वज्रादपि कठोराणी.. हिऱ्यापेक्षा कठीण आणि लोकांच्या मदतीला जाताना मृदुनी कुसुमादापि.. फुलापेक्षा कोमल म्हणूनच भारतीयांनी त्यांना लोकमान्यता दिली.. . असा पुरुष परत होणे नाही..

ss--ss--ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss



# पुण्यातील चातुर्य संपलं.

१३ मार्च १८००.. २१८ वर्षे झाली. या दिवशी बाळाजी जनार्दन भानू म्हणजेच नाना फडणीसांचा अल्पशा आजाराने पुण्यात मृत्यू झाला. इंग्रजांच्या पुण्यातील कर्नल पामरने आपल्या कलकत्त्याच्या वरिष्ठांना कळवलं, “ नानाबरोबर मराठी राज्याचं शहाणपण आणि समतोलपणा सर्व लयाला गेला. ” ब्राऊन रिंग सेनाधिकारी सरदार पटवर्धनांना म्हणाले, “ नाना गेले.. तुमच्या राज्यातील दाब गेला.. ” साम्राज्यवादी इंग्रजांना, इ. स. १७७२ मध्ये माधवराव पेशव्यांचा मृत्यू झाल्यावर मराठी राज्य गिळण्याची स्वप्नं पडायला लागली होती. माधवरावांच्या काळात त्यांचे दोन जबरदस्त शत्रू होते, एक समृध्द मैसूरचा हैदरअली आणि प्रचंड मोठ्या स्वराज्याचे माधवराव. पण नाना फडणीस नावाच्या माधवरावाच्या तालमीत तयार झालेल्या व्यक्तीने इ. स. १७७२ पासून १८०० सालापर्यंत राज्य इंग्रजांना गिळू दिलं नाही. स्वराज्याचा उत्तर भाग महादजी शिंदे यांनी सांभाळला आणि राजधानी आणि दक्षिण नानांनी सांभाळला. राघोबादादाना हाताशी धरून राज्य बळकावण्याचे इंग्रजांचे प्रयत्न नानांनी उधळले आणि आपल्या राजकीय मुत्सद्दीगिरीने सर्व उतावीळ लोभी शत्रूंना दूर ठेवलं..

कोकणातील वेळास गावात भानू नावाचं कुटुंब राहत होतं. जवळच्या श्रीवर्धन मध्ये भट नावाचं देशमुखांचं घराणं होतं.. या घराण्यातील बाळाजी विश्वनाथ हा तरुण चिपळूणला मिठागराच्या नोकरीत जकात वसुलीवर राहिला. कोकणावर जंजिर्याच्या हबशाची सत्ता होती. एके वर्षी हबशाची बाळाजी विश्वानाथांवर खपा मर्जी झाली. त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला. चिपळूणचे ब्रह्मेंद्र स्वामी यांनी देशावर जा असा सल्ला दिला तेव्हा बाळाजी विश्वनाथ भट

देशावर यायला निघाले. त्यांना साथ दिली ती भानू घराण्यातील बाळाजी यांच्या आप्त आणि मित्र असलेल्या रामजी, बाळाजी, हरी महादेव  या ३ भावांनी.

चौघांनी मिळून भविष्याच्या अंधारात उडी मारायचं ठरवलं.. सिद्दी कासीम हबशाची नजर चुकवत चौघे तिवरे घाट ओलांडून साताऱ्याला पालीच्या जोशांकडे आले. ते तिथे सावकारी करत होते. त्यांनी शिवाजीराजांच्या काळापासून मातब्बर सरदार असलेल्या सासवडच्या पुरंदऱ्यांकडे जायला सांगितलं. त्यांनी धनाजी जाधवांकडे पाठवलं. आणि मग धनाजी जाधवांकडे या चौघांना काम मिळालं. धनाजींचा फडणीशी हिशेबाचा कारभार बाळाजींकडे आला. आणि भानू फडणीस झाले. आपल्या हुशारीवर पुढच्या काळात बाळाजी विश्वनाथांनी सरसुभेदाराच्या पदापर्यंत पल्ला गाठला. तो काल स्वराज्यात प्रचंड अस्थिरतेचा होता. शिवाजीराजांच्या कैलासवासानंतर लगेच औरंगजेब लाख सैन्य घेऊन स्वराज्य जिंकायला आला होता.. शिवरायांच्या नंतर १० वर्षे संभाजीराजे, १० वर्षे राजारामराजे आणि मग सत्ता ताराराणीकडे आली. सर्वांनी औरंगजेबाच्या मोगल सत्तेपासून स्वराज्याचं रक्षण केलं.

इ. स. १७०७ मध्ये ८७ व्या वर्षी नगरला औरंगजेब मेला आणि परत मोठी कलाटणी स्वराज्याच्या राजकारणाला मिळाली. दिल्लीचं तख्त मिळवायला दिल्लीला जातांना औरंगजेबाच्या शहाज्यादांनी २५ वर्षे औरंगजेबाच्या कैदेत असलेल्या संभाजीपुत्र शाहूला मोकळं केलं आणि स्वराज्याची सनद देऊन महाराष्ट्रात पाठवलं. तख्ताला दोन मालक झाले. स्वराज्यात ताराराणी वि. शाहू अशी फूट पडली. काही राणीच्या पक्षाचे, काही शाहूच्या आणि काही कुंपणावर असं राजकारण रंगलं.. बाळाजी विश्वनाथ शाहूला मिळाले. सत्तेचा अधिकार मिळवायला ताराराणी आणि शाहूराजांची लढाई झाली. ताराराणीकडे सत्ता, पैसा, आणि फौज होती. उलट हाती पैसा, फौज आणि विश्वासाची साथ देणारी माणसं

थोडी असताना भीमेच्या काठावर खेडजवळ शाहू आणि ताराराणीच्या फौजांची, इ. स. १७०७ च्या दिवाळीच्या धनत्रयोदशीच्या दिवशी गाठ पडली. त्याआधीच बाळाजी विश्वनाथांच्या गुप्त मुत्सद्दीपणाने ताराराणींचा पक्ष सोडून त्यांचा सेनापती धनाजी जाधव फौजेसह शाहूराजांना मिळाले. ताराराणी लढाई हरल्या आणि पन्हाळयाला निघून गेल्या.

दिवाळीत मिळालेल्या या राजलक्ष्मीनंतर शाहूराजांनी १७०८ साली जानेवारीत स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला. स्वराज्यावरचा मोगल आक्रमणाचा अंधारलेला दुष्ट काळ संपला. मंत्रिमंडळ तयार झालं. बाळाजी विश्वनाथ भट सेनाकर्ते झाले. आता अनेक विरोधकांना आपल्या हाताखाली आणायचं काम राजांना करायचं होतं. त्यासाठी सर्व विरोधकांवर फौजा रवाना झाल्या. पश्चिम किनारा सांभाळणारे कान्होजी आंग्रे यांनी शाहूंचे पेशवे बहिरोपंताना पकडलं. आता त्यांना सोडवायचं काम बाळाजी विश्वनाथांवर आलं. राज्याला पेशवा नाही ही वाईट प्रतिमा होऊ नये म्हणून त्यांना पेशवेपद देऊन शाहूराजांनी आंग्रे यांच्यावर पाठवलं. १७ -११- १३ या दिवशी पुण्याजवळ मांजरी इथे पेशवेपदाचा सोहळा पार पडला. नंतर बाळाजी विश्वनाथांनी कान्होजी आंग्रे यांची लोहगडावर भेट घेऊन राजकारण करून, लढाई न करता त्यांनाही शाहूच्या पक्षात आणलं आणि बहिरोपंताना सोडवून आणलं. बाळाजी विश्वनाथांच्या राजकारणावर शाहूराजे खूष झाले.

अशा रितीने भट घराण्यात पेशवेपद आलं आणि पुढे १०० वर्षे राहिलं. भानू भावांमधल्या बाळाजीपंताना पेशव्यांनी फडणीशी दिली आणि नाना फडणीस जाईपर्यंत ते शतकभर त्यांच्या घराण्यात राहिली. अशी आली पेशवाई, आणि फडणीशी भट आणि भानू यांच्या घराण्यात. फडणीस म्हणजे राज्याचं अर्थखाते आणि गृहमंत्रीपद. संभाजीराजांच्या अटकेनंतर औरंगजेबाने शाहू आणि येसूबाईना आपल्याजवळ कैदेत ठेवलं. शाहूला हुकुमाचा एक्का म्हणून बादशाहा मराठ्यांविरूद्ध

राजकारण खेळला. कैदेमुळे शाहूराजांना लष्करी शिक्षण मिळालं नाही पण राजकारण आणि माणसं पारखणं छान जमलं. बाळाजी विश्वनाथांनी पैसा आणि फौज कमी असतांना खूप मदत करून शाहूराजांना स्थिर केलं. नंतर पेशव्यांनी दिल्लीला जाऊन शाहूराजांच्या आईला येसूबाईंना सोडवून आणलं आणि नवीन बादशाहाकडून राज्याची सनद आणली.

नानांचे वडील जनार्दनपंत वारल्यावर पेशवे माधवरावांनी नानांना फडणीसपद दिलं. तेव्हा ते १६ वर्षाचे होते. नाना फडणीसांनी खूप राजकारण पाहिलं. पानिपत, माधवरावांचा अल्पवयीन मृत्यू, राघोबादादांचा पेशवेपद मिळवण्याचा हव्यास, नारायणराव पेशव्यांचा खून, नारायणराव पेशव्यांच्या गर्भवती पत्नीला सुरक्षितपणे सिंहगडावर हलवून राघोबादादांपासून त्यांना जपणं, सवाई माधवरावांचा जन्म झाल्यावर त्यांच्या नावे ४०व्या दिवशी पेशवाईची वस्त्रे आणून राघोबादादांना दूर करणं, इंग्रजांच्या ताब्यात गेलेल्या राघोबादादांना आणून कैदेत ठेवणं, त्यांना फितूर असणाऱ्या सखारामबापू बोकीलांना कैदेत टाकणं, हैदर आणि इंग्रजांपासून मुलुख सांभाळणं, असे अनेक उद्योग राज्य वाचवायला करावे लागले.

पानिपतावरून नियतीने दोघांना जीव वाचवून स्वराज्यात आणलं, ते म्हणजे कारभारी झालेले नाना फडणीस आणि महादजी शिंदे, ज्यांनी पुढे स्वराज्याची धुरा समर्थपणे सांभाळली. माधवराव पेशव्यांच्या काळात नाना फडणीस पेशव्यांचा उजवा हात बनले. त्यांना खोटं बोलणं कधी आवडलं नाही. त्यांचा ज्योतिषावर खूप विश्वास होता. सवाई माधवरावांना हाताशी धरून नानांनी राज्य केलं. निजाम आणि हैदरअलीने इंग्रजांच्या विरूध्द राजकारण करण्याचे सारे अधिकार नानांना दिले. इंग्रजांनाही नाना फडणीसांना आपल्या गळाला लावणं कधी जमलं नाही. फडणीस पदाला वारस व्हावा म्हणून नानांनी ९

लग्ने केली. त्यांना २ मुली आणि एक मुलगा झाला ते सर्व बालपणीच वारले. पण फडणीसपदाला वारस म्हणून पुत्र झाला नाही. एक मुलगा दत्तक घेतला तोही वारला. ते निपुत्रिकच गेले. त्यांची एक पत्नी त्यांच्या मृत्यूनंतर १५ दिवसात गेली, आणि एक मागे राहिली.

नानांना काशीला जाण्याची फार इच्छा होती, पण ती सफल झाली नाही, तेव्हा त्यांनी काशीचा नकाशा एका रेशमी कापडावर काढवून आणला. रोज ते त्याचंच दर्शन घेत असतं. काशीत कर्मनाशी नदीवर दानधर्म म्हणून त्यांनी एक पूल बांधायचं काम सुरु केलं. पण वाळू आणि पाणी यामुळे पूल सतत खचत होता. तेव्हा तिथल्या लोकांनी ब्राह्मणांच्या मदतीने अनुष्ठानाला सुरुवात केली. नानांना हे कळल्यावर त्यांनी अनुष्ठान बंद करवलं आणि बेकर नावाच्या इंग्रजी इंजिनियरला कलकत्त्याहून चुनकळीचे बंब आणि इतर सामान आणायला लावून पूल पूर्ण केला. (पण महाराष्ट्रात सर्व नद्यांवर पूल बांधले नाहीत )

दुसऱ्या बाजीरावाच्या काळात दरबार खूप नासला. त्यांना अटक करण्याचं जे कारस्थान झालं त्यात नानांनी जी बौद्धिक करामत दाखवली ते महाडचं राजकारण म्हणून प्रसिध्द आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात नानांनी रसातळाला जाणारं राजकारणही पाहिलं. तिथे मात्र त्यांचं शहाणपण चालेना.

सवाई माधवराव पेशवा आणि कारभार हे दोन्ही अधिकार नानांच्या हाती होते, पण लष्करी शिक्षणाच्या बाजूने ते पूर्ण लंगडे होते. ते शिक्षण त्यांना असते तर नाना फडणीसनी स्वत:चा राजवंश सुरु केला असता असं एका त्यांचा कारभार पाहिलेल्या इंग्रजी कोल्ब्रूक नावाच्या अधिकाऱ्याने लिहून ठेवलं आहे.

नाना फडणीस गेल्यावर १८०३ मध्ये ३ वर्षातच दुसरा बाजीराव इंग्रजांच्या ताब्यात गेला.. पुण्यात इंग्रजी अंमल सुरु झाला.

जगावर सत्ता गाजवणाऱ्या भारतीयांच्या शत्रूने केलेल्या कौतुकानंतर, नानांच्या नंतर गेलेलं चातुर्य पुण्यात परत आलं आहे का ?

Ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss

.

# पृथ्वीराज चौहान आणि संयोगिता.

**अकरावं शतक संपत असतांना ११९५ मध्ये दिल्लीचं सिंहासन उलथलं गेलं आणि तुर्की सल्तनतीला प्रारंभ झाला. हिंदूंची सत्ता संपली. लढाई झाली ती कुरुक्षेत्राजवळ तरायन जवळ. यावेळी खलनायक गांधार देशाचा शकुनी नव्हता तर गझनीचा शकुनी होता.. त्याचं नाव महंमद घोरी. मूळ कारण पृथ्वीराज आणि त्याचा मावसभाऊ जयचंद यांच्यातील वैमनस्य. जयचंदने घोरीला मदत केली. आणि स्वत:ही घोरीमुळेच संपला. मानसिकता कौरव पांडवांचीच, परक्याच्या बुद्धी भेदावर विश्वास ठेऊन आपापसात लढून आपला घात करून घ्यायचा. मुसलमान आणि इंग्रज या दोघांनीही एकच समान वाक्य भारतीयांबद्दल लिहून ठेवलंय , “ हे सगळे राजे एक झाले असते तर आम्हाला इथे राज्य करता आलं नसतं. उलट आम्ही आलो आणि लगेच हे भारतीय बाजूला झाले आणि त्यांनी आम्हाला राज्य करू दिलं.. एकमेकात खूप भांडतात. ”**

आपल्या प्रेमिकेला स्वयंवरातून पळवून नेणारे दोन प्रेमवीर भारतात अजूनही प्रसिध्द आहेत. पहिला, रुक्मिणीला रथात घालून नेणारा मथुरेचा कृष्ण आणि दुसरा, आपल्या प्रेमिकेला-संयोगितेला घोड्यावर घालून भर स्वयंवरातून उचलणारा अजमेरचा पृथ्वीराज.

पृथ्वीराज चौहान हा दिल्लीच्या राजा अनंगपाल तोमरचा नातू.. . अनंगपालला दोन कन्या. एक कमलावती अजमेरच्या सोमेश्वरला दिली आणि दुसरी रुपसुंदरी कनोजच्या विजयचंद राठोडला दिली. या दोघींचे मुलगे म्हणजे अजमेरचा पृथ्वीराज आणि कनोजचा जयचंद. सख्खे मावस भाऊ. सोमेश्वर तरुण वयात वारला

आणि पृथ्वीराज १२ व्या वर्षी गादीवर आला. पहिली २ वर्षे आपली आई आणि प्रधान मंत्री यांच्या सल्ल्यानुसार वागला. पण नंतर आपल्या पराक्रमाने तळपायला लागला. आपल्या आजूबाजूच्या सर्व राजांना त्याने जिंकून घेतलं. आपला चुलत भाऊ नागपाल याला जिंकल्यावर त्याने मृत शत्रूची मुंडकी आपल्या वेशीवर टांगली आणि दहशत बसवली. त्याचं शौर्य आणि सामर्थ्य पाहून अनंगपालने आपला दिल्लीचा कारभार याच नातवाकडे सोपवला. आजोबांचं हे वागणं पाहून जयचंद पृथ्विराजबद्दल मत्सराने जाळायला लागला.

त्यातच त्याच्या लक्षात आलं की आपली मुलगी संयोगिता पृथ्विराजाच्या प्रेमात पडली आहे. जयचंदने लगेच कनोजमध्ये संयोगितेचं स्वयंवर भरवलं. पृथ्वीराजला आमंत्रण तर दिलं नाहीच, उलट त्याचा अपमान करण्यासाठी त्याचा पुतळा बनवून महालाच्या दाराशी पहारेकरी म्हणून ठेवला. पृथ्वीराजला हे कळल्याबरोबर त्याने आपला कविमित्र चंदवरदाई याच्याबरोबर निरोप पाठवला की मी वेषांतर करून येईन. संयोगिता खूष झाली. स्वयंवराचा दिवस उजाडला. स्वयंवर सुरु झालं, संयोगिता एकेका राजाला पाहत पुढे पुढे निघाली. तिला कुठेच पृथ्वीराज दिसला नाही, तेव्हा ती दाराजवळ पुतळयाजवळ गेली आणि त्या पुतळयाच्या गळयात तिने हार घातला. त्याबरोबर पृथ्वीराज अचानक तिथे आला आणि सेवकांनी तयार ठेवलेल्या घोड्यावर तिला घालून पसार झाला. जयचंद संतापला. अजमेरला जाऊन पृथ्विराजाने धूमधडाक्यात लग्न केलं. जयचंद सूडाने पेटला. आता सूड घ्यायला जयचंदला महंमद घोरी आठवला.

इ. स. ११९१ मध्ये महंमद घोरी मागे एकदा पृथ्विराजचा मार खाऊन गेला होताच. त्यावेळी तो जखमी झाला होता, त्याचं सैन्य पळत सुटल होतं. त्यालाही सूड घ्यायचाच होता पृथ्विराजचा.. यावेळी मात्र त्याने फसवणूक करायचा मार्ग निवडला. १,२०,००० घोडदळ घेऊन तो परत दिल्लीजवळ “

तरायन " गावात उतरला पण आपण आपल्या भावाने परत बोलावलं तर परत जाऊ, असा खोटा संदेश पाठवून गप्प राहिला. पृथ्विराजची सेना निर्धास्त झाली. तेव्हा पहाटे अचानक धाड घालून घोरीने पृथ्वीराजला हरवलं आणि गझनीला नेलं. अजमेरच्या गादीवर पृथ्विराजच्या मुलाला बसवलं मांडलिक म्हणून..

थोराड, चपळ, घोडे आणि रिकिबीत पाय अडकवून दोन्ही हातांनी तिरंदाजी करण्याचं प्राविण्य मिळवलेल्या तुर्कांनी या दोन गोष्टींच्या प्रभावाने विजय मिळवला. आपले अशक्त घोडे पळून जाणाऱ्या तुर्कांचा पाठलाग करू शकलेच नाहीत..

पृथ्विराजच्या मृत्यूबद्दलची एक आख्यायिका.. .

पृथ्वीराजला तुरुंगात ठेवून त्याचे डोळे फोडले. त्यानंतर चंदवरदाई त्याला शोधत गझनीला आला. आपली ओळख न दाखवता घोरीची मर्जी मिळवली. एक दिवस घोरीला म्हणाला की आपण तिरंदाजीची स्पर्धा घेऊ..

घोरीला कल्पना आवडली. घोरीच्या महालाच्या खालच्या मैदानात स्पर्धा सुरु झाली तेव्हा चंदवरदाई घोरीला म्हणाला की मी इतके दिवस पृथ्विराजाचं नाव ऐकून होतो. त्याच्यासारखा दुसरं नेमबाज कुणी झाला नाही म्हणतात. त्याबरोबर घोरीने पृथ्वीराजला कैदेतून मोकळं करून मैदानात आणलं. त्याच्या हातात तीर कमान दिलं. तेव्हा चंदवरदाई त्याच्या जवळ जाऊन दोन ओळी म्हणाला,

चार बांस, चोबीस गज, अष्ट अंगुली प्रणाम।

ता उपर सुलतान है, मत चुको चौहान।

एक बांबू = किती फूट ? एक अंगुली = किती इंच ? एक गज= ३ फूट.

घोरीने हुकूम सोडला, पृथ्विराजने त्या आवाजाचा वेध घेतला, आणि मित्राने सांगितलेलं अंतर लक्षात घेऊन तीर सोडला तो सरळ घोरीच्या छातीत.. सुलतानाच्या अचानक झालेल्या या मौतने तिथे भगदड झाली. तिथल्या शिपायांनी पकडण्याच्या आत, पृथ्वीराज आणि चंदवरदाईने तिथल्या तिथे एकमेकांच्या पोटात खंजीर खुपसून प्राण दिला.

तरुण वयात दोघेही आवाजाच्या वेधाने डोळयावर पट्टी बांधून सराव करत. तो आज उपयोगी पडला.. .

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS

# बैसाखीचा वणवा.

**स्वातंत्र्य चळवळीचा काल होता तो. भारताच्या हवेतच देशमुक्तीचा प्राणवायू होता. टिळक, गांधी, लजपतराय, बिपीनचंद्र पाल, सावरकर असे राजकीय नेते देशाच्या मुक्तीसाठी निस्वार्थीपणे तुरुंगवास भोगत होते. अंदमानात हजारो तरुण क्रांतीच्या खडतर मार्गावर चालून, बंदिवान बनून कोलू फिरवत होते. प्राणार्पण करण्याची नशा चढली होती तरुणांमध्ये. . भगतसिंग त्यांचा आदर्श होता. राजकीय नेते लोकांमध्ये इंग्रजांच्या कुटील नीतीचा अर्थ समजावून सांगून जनजागृती करत होते. आदर्शाने, त्यागाने, भारलेला काल होता तो..**

१३ एप्रिल १९१९.

९९ वर्षापूर्वीची गोष्ट. बैसाखीचा दिवस. शिखांचा खालसा-पवित्र दिवस. खालसाच्या स्थापनेचाही पवित्र दिवस. शेतातील पिकं नव्या दानाला तयार झालेली, घरं रांगोळयांनी नटलेली, पक्कानांनी दरवळलेली, माहोल खुशीचा होता. सारा पंजाब, सण साजरा करण्यात दंग होता. एप्रिलमधलं निसर्गाचं वातावरण तप्त होतं.

तिकडे राजकारणही चांगलंच गरम झालं होतं. स्वराज्याच्या चळवळीला आपल्या खांद्यावर घेणारे अनेक तळमळीचे आणि तेजस्वी नेते, आपल्यावरील अन्यायाचं रूप सामान्यांना समजावून सांगण्यासाठी सभा घेत होते. मार्चमध्ये इंग्रज सरकारने एक कायदा पास केला. भारतीयांवर दहशत निर्माण करणारा या

कायद्याविरुध्द भारतीय नेत्यांनी चळवळ सुरु केली. या कायद्याच्या आधारे राष्ट्रीय आंदोलने दडपून टाकण्यासाठी सरकार कुणालाही कधीही कुठेही अटक करू शकणार होतं. तुरुंगात डांबू शकणार होतं. या कायद्याविरुध्ह वातावरण चांगलंच तापलं होतं.. निदर्शनं, हरताळ, मिरवणुकांनी आपला रोष गांधीजी, किचालू, अनेक भारतातील सर्व थोर नेते, जनजागृती करत सभा घेत हिंडत होते. सर सिडनी रौलट यांच्या समितीने हा कायदा बनवला होता.

अमृतसरमध्ये संध्याकाळी या कायद्याविरुध्ह जालियनवाला बागेत सभा भरणार होती. सकाळी सण साजरा करून जालियनवाला बागेत संध्याकाळी हजारावर लोक जमायला लागले. या मैदानाला जाणारा एकच चिंचोळा मार्ग, आत बागेच्या भोवती उंच जाळया, आणि ६/७ एकरावर पसरलेलं मोठं मैदान. इंग्रज सरकार या चळवळी मोडून काढण्याचे मार्ग शोधायला लागली. पंजाबच्या गव्हर्नर जनरल मायकल ओडवायरने आजची सभा होऊ नये म्हणून मार्शलlaw लॉ लावायचं ठरवलं. ब्रिगेडियर जनरल डायरने गावात कर्फ्यू जाहीर करून सभेला बंदी आणायचा प्रयत्न केला तरी हजारो लोक जमले. आपल्या हुकूमाला लोक किंमत देत नाही आहेत म्हणून चिडलेल्या ही सभा चिरडून टाकायचा निश्चय डायरने केला. त्याने आपल्या पलटणी सुरक्षेच्या नावाने बागेच्या तोंडाशी आणून ठेवल्या.

४. ३० वाजता दुपारी सभा सुरु झाली. लोक तन्मयतेने या नवीन कायद्याची माहिती करून घ्यायला लागले. वक्त्याच्या ओजस्वी भाषणात दंग झाले. इतक्यात डायरच्या मनात सैतान शिरला. त्याने आपल्या गुरखा पलटणीला इशारा केला आणि मृत्यूचं थैमान सुरु झालं. सूं सूं करत निष्पाप भोळया जनतेवर बंदुकीच्या गोळयांनी वर्षाव झाला. जागच्या जागी पुरुष-स्त्रिया-तरुण प्राण सोडायला लागले. आक्रोश, किंकाळया आकाशापर्यंत पोचल्या. क्रूरतेचा कळस झाला. १० मिनिटात १६५० फैरी झाडल्या गेल्या. लोक सैरावैरा धावू लागले. त्या

चेंगराचेंगरीने कितीतरी निष्पाप जखमी तरी झाले, काहींनी श्वासच संपवला. जीव वाचवून बाहेर पाळणाऱ्या लोकांना बाहेर पडायला एकच बोळ. तिथे तर रायफल घेतलेले डायरचे सैनिक. हैवानाचं थैमान होतं ते ! दिवस किती शुभ चिन्हांचा आणि घडलं काय ? बेछूटपणे उडवलेल्या त्या गोळया जालियनवाला बागेच्या भिंतीनीही आपल्या छातीवर झेलल्या होत्या. ते व्रण अजूनही आहेत.

गावावर भयाण शोककळा पसरली. बंदुकीच्या गोळयांचा आवाज ऐकल्यावर थरकाप झालेले लोक आपले लोक शोधायला बाहेर पडले. गावातील लोक गोळा झाले तेव्हा काय घडलंय ते गावाला कळलं. आपापल्या माणसाला शोधायला जावं तर भीती, न जावं तर विव्हळणारे जखमी.. संध्याकाळी सुरु झालेला हा आक्रोश डायरच्या भीतीने दडपला गेला. रात्र तशीच भयाण होती. फौज गस्त घालतच होती. बागेजवळ जायची कुणाची हिंमतच नव्हती. गावातील एक स्त्री रत्नादेवी त्या आवाजाने घाबरली. आपला नवरा सभेला गेलाय हे तिला माहीत होतं. रात्र झाली तरी तो आला नाही म्हणून आपल्या नवऱ्याला शोधायला एकटीच त्या बागेत शिरली. प्रेतांचा खच पडलेला तिने पहिला. काहीजण अजूनही जीव गेला नाही म्हणून तडफडत होते.. रक्ताचा पूर वाहत होतं. तिला त्या भयाण अंधारात पतीचा देह सापडला पण त्याच शव घरी आणायला ना चारपाई मिळाली, ना प्रेत उचलायला कुणाची मदत मिळाली. त्या भेसूर रात्री, अनेक देहांच्या रक्ताच्या थारोळयात ती पहाट होईपर्यंत शवांच्या गराड्यात बसून राहिली.

अमानुषतेचा तो कळस होता. या क्रौर्याची भारतभर ठिणगी पडली. सभेत सर्वांना पाणी देण्याचं काम करणाऱ्या एका तरुणाने तिथेच इंग्रजांना एक सणसणीत शिवी हासडली आणि ओडवायरला संपवण्याची प्रतिज्ञा केली. तो तरुण मग शिक्षणाच्या निमित्ताने लंडनला गेला. भगतसिंगचा आदर्श ठेवणारा हा चेला

क्रांतिकारकांच्या सहवासात आला. त्याने पिस्तूल मिळवलं. लंडन मध्ये राहून योग्य संधीची वात पहार राहिला.

एक दिवस ती संधी आली. ती तारीख होती १३ मार्च १९४०. Caxton हॉलवर ओडवायर येणार आहे, हे कळल्यावर तिथे पोचला. ओडवायर भाषणाला उठला तेव्हा त्याच्या छातीत पिस्तुलाच्या गोळया घुसवल्यावरच तो शांत झाला. त्याच्या छातीत जळत राहिलेला तो सूडाचा निखारा २१ वर्षांनी विझला.. जालीयनवाला बागेत प्राण गमावलेल्या अनेकांना मुक्ती मिळाली. न्याय मिळाला. ३१ जुलै, १९४० या दिवशी आपल्या देहाचं तर्पण त्याने केलं. फाशी तर होणारच होती त्याला. शहीद झालेल्या त्या तरुणाचं नाव होतं उधमसिंग. वीरश्रीचे दिवस होते. देशाच्या मुक्ततेच कंकण बांधलेले, त्यासाठी बलिदानाला तयार असलेले, तरुण होते. स्वत: तुरुंगवास भोगणारे, त्यांना मार्गदर्शन करणारे, पिस्तुलं मिळवून देणारे, अंगार अंगात असलेले नेते होते. भूमिपुत्र असावा तर असा.

आज ९९ वर्षे झाली, पण भारतीयांच्या मनातली जखम अजून ओलीच आहे.

S==S. S==S. S==S. S==S. S==S. S==S. S==S.

# मुहंमद शाह रंगीले - सदारंग आणि अदारंग.

**अभिजात संगीताला वाचवण्यासाठी सदारंग, अदारंग या दोन युवकांनी सुलतानाचं नाव देऊन शास्त्रीय संगीताला वाचवलं आणि उर्जितावस्था आणली. सदारंग-अदारंग म्हणजेच तानसेनच्या वंशातील नेमतखान आणि फिरोजखान.**

ज्यांना ज्यांना शास्त्रीय संगीत आवडतं त्यांना सर्वांना ही तीन नावं माहीत असतातच ! अनेक रागांच्या चीजांमध्ये ही नावं येतात. ज्यांना शास्त्रीय संगीत माहीत नाही त्यांना हिंदी सिनेमातील मन्ना डे यांच " मुहंमद शाह रंगीले " हे गाणं तरी माहीत असतंच.

यातला मुहंमदशाह हा औरंगजेबानंतर बादशहा बनलेला आणि बरीच वर्षे टिकलेला सुलतान. याचं मूळ नाव रोशन अख्तर. औरंगजेबाचा हा पणतू, अनेक वर्षे सलीमगढच्या किल्ल्यात कैदखान्यात पडून होता. त्या काळात दिल्लीचा सगळा कारभार सय्यद बंधूंच्या हाती होता. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बादशहा नुसते नावापुरतेच झाले. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याचे तीन वारस गादीवर आले आणि मारले गेले. आता गादीवर कुणाला बसवावं या विवंचनेत सय्यद हुसेन अली खान आणि सय्यद अब्दुल्ला होते. तर त्यांना या कैदेतील औरंगजेबाच्या पणतूची आठवण झाली. त्याला कैदेतून बाहेर काढून, त्याच्या डोक्यावर ताज ठेवून, मुहंमदशाह हे नामकरण

करून तख्तावर बसवलं गेलं आणि वजीर कारभार चालवायला लागले. पण काही दिवसांमध्ये सय्यद बंधू मारले गेले.

रोशनखानला जरी राजकारणातील ओ की ठो कळत नव्हतं, तरी त्याची आई हुशार होती. म्हणून त्याने नाच-गाण्यात दंग राहायचा सोपा उद्योग निवडला. मुहंमदशाह रंगीले झाला. मग काय राजमहालात घुंगरू आणि गाणी बजावणी रात्रंदिवस चालू राहायला लागली. रहमानबाई, कमालबाई, पन्ना बाई, अशा अनेक राज नर्तिका-गायिकांच्या मागे सरदार, उमराव लागले होते. या बायकांवर खजिना रिता व्हायला लागला. त्याची आवडती नूरबाई नावाची गायिका तर त्याच्या दरबारात इतकी प्रसिध्द होती की ती घरून निघाली की तिचा मोठा लवाजमा तिच्याबरोबर असे. दरबारात सवंग गायनाला राजाश्रय मिळाला.

राज दरबार हीन पातळीच्या संगीताने गाजायला लागला. हा रंगरलीयांमध्ये बुडालेला राजा पाहून, शास्त्रीय संगीताची झालेली वाईट अवस्था पाहून तानसेनच्या घराण्यातील त्याचा वंशज नेमतखान याने, दुर्गतीला पोचलेलं संगीत वाचवण्यासाठी, विचारपूर्वक, लोकांना आवडतील अशा बंदिशी बांधून दरबारात पेश केल्या आणि श्रोत्यांना जिंकलं.. या शास्त्रीय संगीताला आणखी जीवदान मिळावं म्हणून त्याने आपल्या चीजांमध्ये मुहंमदशाह रंगीले हे शब्दही घुसडले. त्यामुळे बादशहा आणखीनच खूष झाला आणि बाजारू संगीत मागे पडून लोकांना शुध्द शास्त्रीय संगीत ऐकायला मिळायला लागलं. धृपद गायकीला जीवदान मिळालं. नेमतखानाने संगीतासाठी आपलं आयुष्य वेचलं. बादशाहालाच हे संगीत आवडतंय हे पाहिल्यावर दरबारीसुद्धा सदारंग अदारंग यांचं कौतुक करू लागले.

तानसेनच्या मुलाचा म्हणजे बिलासखानचा जावई लालखान हा शास्त्रीय संगीतातील मोठा जाणकार होता. बिन वाजवण्यात तो प्रसिध्द होता.

लालखानचा मुलगा खुशहालखान हाही संगीतात पंडित होता. त्याला औरंगजेबाने ‘ गुण सुंदर ’ ही उपाधी दिली होती. याच घराण्यात सदारंग आणि अदारंग यांचा जन्म झाला. सदारंग याने संगीतावर खूप पुस्तकं लिहिली. या दोघांनी शास्त्रीय संगीताला परत जीवदान दिलं. ख्याल गायकी सदारंगने लोकप्रिय केली.

मुहंमद शाह रंगीले या शब्दांनी राजाश्रय मिळाला आणि जादू केली हे सत्य..

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS

# राजधानी दौलताबाद.

**वेडा महंमद या नावाने इतिहासात ज्याची नोंद आहे, तो वेडा का तर त्याने घेतलेले निर्णय लोकांना पचले नाहीत. बाप तुर्की, आई हिंदू आणि पत्नी दीपालपूरची राजकन्या असा हा महंमद तुघलक इ. स. १३२५ ते १३५१ पर्यंत सुलतान बनून कारभार करून गेला.**

औरंगजेबाने ६ महिन्यांच्यासाठी थंड हवेच्या ठिकाणी, काश्मीरला राजधानी हलवण्याचा रिवाज ठेवला. समर्थ शासकाचा तो आत्मविश्वास होता.. पण शासक समाजाला रुचेल असा विचार करणारा नसेल तर ? मग महंमद तुघलकाच्या राजधानी दौलताबादला नेण्याच्या निर्णयासारखं दुसरं उदाहरण नाही.

अल्लाउद्दिन खिलजीनंतर गियासुद्दीन तुघलकाने आपली सत्ता सुरु केली. त्याच्यानंतर त्याचा मुलगा महंमद तुघलक सुलतान बनला. त्याच मूळ नाव जुनाशाह उर्फ अलग खान. त्याच्याबद्दल दोन प्रवाद वाचायला मिळतात. एक, तो खूप देखणा होता, खूप बुद्धिमान होता, आणि दुसरं, तो खूप कुरूप होता आणि वेडा होता.. त्याने खिलजीचं मुक्कामाचं शहर सिरी आणि पृथ्वीराजचं कोटराय पिथौरा सोडून आपलं एक शहर वसवलं. त्याचं नाव त्याने जहांपनाह ठेवलं.

त्याच्या वेडेपणाच्या बऱ्याच आख्यायिका आहेत. खऱ्या खोट्या माहीत नाही. पण खोट्या वाटाव्यात अशाच आहेत. एकदा तो कपडे बदलत होता, तेव्हा महालाच्या झरोक्यातून सूर्याची किरणं आत आली. त्याला वाटलं की कुणीतरी चोरून आपल्याकडे पहातंय. त्यावरून त्याचा संताप अनावर झाला, आणि त्याने चोरून बघाणाराला पकडून आणायला सांगितलं. हुजर्याने ती किरणे असल्याचं सांगितलं. पण सुलतानाचा विश्वास बसला नाही. त्याने मोठी फौज पूर्वेकडे पाठवली. लष्कराच्या त्या धावण्याने घोड्यांच्या टापाखाली मोठा धुरळा उठला आणि महालात येणारी किरणं त्या धुळीमुळे झाकली गेली. महंमद तुघलकाला बरं वाटलं. अशी आणखीही उदाहरणं आहेत पण अंदाज यायला एवढं एक पुरे.

आपली राजधानी दौलताबादला नेणं, आणि चलनातील चांदीचा रुपया काढून तांब्याचं नाणं काढणं यामुळे " तुघलकी कारभार " हा शब्दप्रयोग रूढ झाला तो कायमचा. अजूनही वापरत राहिलेला हा शब्दप्रयोग का आणि कसा घडला ? महंमद तुघलकाने केलेला विचार असाच होता. त्याने अखंड भारत आपल्या ताब्यात ठेवायचा असेल तर राजधानी दिल्लीला न ठेवता भारताच्या मध्यभागात पाहिजे, आणि त्यासाठी औरंगाबाद हे मध्यवर्ती ठिकाण राजधानीसाठी योग्य आहे असं निश्चित केलं. विचार चुकीचा नक्कीच नव्हता. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाची राजधानी देशाला मध्यवर्ती नागपूरला करण्यासारखंच होतं ते !

उत्तरेला लाहोरपासून भारताच्या दक्षिणेला वारंगळ अशा राज्यांवर हुकुमत गाजवण्यासाठी देवगिरीवर राजधानी हलवण्याचा २ वर्षांच्या विचारानंतर निर्णय घेतला. महंमद घोरी पृथ्वीराज चौहानला हरवून, सिंहासनाला सल्तनत मध्ये बदलून निघून गेला. त्याच्या मागे कुतुबुद्दीन ऐबकाने लाहोर आणि त्यानंतर अल्तमश-रझिया सुलतानाने दिल्ली आपली राजधानी केली होती. पण आता तुघलकाने हा विचार बदलला. देवगिरीवर ( दौलताबाद ) महंमद तुघलकाने स्वारी

केली. तो किल्ला, तिथली पाण्याची सुबत्ता, हवा, त्याला हे सारं त्याला इतकं आवडला की त्याने लगेच दौलताबाद हीच आपली राजधानी हे ठरवूनच टाकलं.

आणि तसं फर्मान काढून तो मोकळा झाला. त्याने त्यासाठी खूप योजना आखल्या. दिल्लीतील सर्व लोकांची घरं खजिन्यातून पैसे देऊन विकत घेतली. मग कुणी त्या घरात राहू नये म्हणून त्या घरांना आगी लावून टाकल्या. उरलेल्या रिकाम्या घरांमध्ये शेजारपाजारच्या वस्तीतील शेतकऱ्यांना राहायला बोलावलं. दिल्ली दौलताबाद मार्गावर झाडं लावली. प्रवासात लोकांच्या मुक्कामासाठी घरं, सराया बांधल्या. त्यासाठी मार्गावरील स्थानिकांच्या जागा घेतल्या. ज्यांच्या जागा घेतल्या त्यांना दुसरीकडे घर बांधून दिली आणि त्या जागेच्या किंमतीही रुपयात दिल्या. देवगिरी वसवण्यासाठी त्याने आधी आपल्या राजप्रासादातील लोक, नातेवाईक, अमीर, सरदार, त्या सर्वांचे गुलाम, खजिना, हुजराती पागा, हत्तीखाना (पीलखाना) यांना देवगिरीला नेलं. ते लोक स्थिरावल्यावर मग प्रतिष्ठित, उलेमा, धर्मगुरू, वगैरे देवगिरीला जायला निघाले. त्यानंतर सामान्यांचा कारवां निघाला. या सर्व स्थलांतरितांना वाटेतील जेवण, राहण्याची सोय फुकट होती. देवगिरीला पोचल्यावरही त्यांना काहीही त्रास होऊ नये याची दक्षता ठेवली गेली होती. दिल्लीच्या रहिवाशांना स्थलांतर करतांना आणि देवगिरीला पोचतांना सढळ हाताने बक्षिशी दिली गेली. देवगिरी नगरीसुद्धा नव्याने बांधली जाऊ लागली. प्रतिष्ठित दरबारी, विद्वान, सरकारी अधिकारी. धर्मगुरू, यांचे वेगवेगळे सुसज्ज भाग तयार केले.

दिल्लीत राहणाऱ्या जनतेत मात्र हाहा:कार माजला. कधीही न बघितलेला प्रदेश, न बघितलेले लोक, किती लांबचा देश आहे हे माहीत नाही, घरची शेतीवाडी सोडायची, उद्योग काय करायचा या चिंतेने, पिढ्यान पिढ्या

दिल्लीत राहिलेले लोक हैराण झाले. पण सुलतानी हुकूम म्हणजे हुकूम. सुलतानाने फतवाच तसा काढला होता की जो कुणी घरी राहील, त्याच्या घरावरून नांगर फिरवला जाईल.

एवढं करून सुलतान थांबला नाही. कोणत्याही माणसाने पळून जाऊ नये म्हणून, फौजेच्या घेऱ्यात जनतेला अडकवून देवगिरीकडे प्रजेला चालायला लावलं. वृद्धांना, मुलाबाळांना, कुत्री-मांजरी-गाई-म्हशी-शेळया-बकऱ्यांना घेऊन जनता चालायला लागली. वधस्तंभाकडे हे लोक जाताहेत की काय असं वाटावं असा हा जथ्था वाटेत  मोठ्याने रडत चालला होता. मग शाही फौजा गावभर फिरल्या. कुणी लपून राहिलं नाही ना, आणि कोणी मागे राहिलं नाही ना याची खात्री करून घेतली. एक आजारी माणूस एका शिपायाला दिसला. तो खाटेवरून उठूही शकत नव्हता, त्याला खंजिराने भोसकून मुक्ती देऊन टाकली. या साऱ्या स्थलांतरात त्याने हिंदू आणि जैनांना वगळलं होतं. ते दिल्लीतच राहिले होते. दौलताबाद शहर राजधानी म्हणून ओळखायला जायला लागलं.

पण उत्तर सीमेवरचे हल्ले वाढले, आणि दौलताबादला प्लेग आणि दुष्काळ पडला, तेव्हा सुलतानाने स्वत:चं राजधानी दिल्लीला नेण्याचं ठरवलं. दिल्ली परत बहरली.. जेव्हा खजिना रिकामा झाला तेव्हा त्याने प्रतीकात्मक चलन म्हणून तांब्याची नाणी काढली. त्यामुळे चांदीचा साठा प्रचंड वाढला. मग लोकांच्या खाजगी टांकसाळी निघाल्या, चांदीची नाणी घरोघर बनायला लागली आणि राज्याचा  अर्थव्यवहार ठप्प झाला. मग तोही प्रयोग फसला.

हाच तो तुघलकी कारभार.

. -S. -s. S. -s. -S. -s. S. -s. S. -s. -S. -s. -S. -s. -S. -

# विवेके करावे साधन.

**मुघल छळाला कंटाळलेल्या आणि पिडलेल्या जनतेचं दु:ख, देवीसमोर मांडून " तुझा तू वाढवि राजा "असं तिलाच आव्हान देणाऱ्या समर्थांच्या विनवणीचं उत्तर आलं. स्वराज्य स्थापनेसाठी एक युवक तुळजाभवानीने पाठवला. त्याच्या तलवारीला यशाचं चमकदार पातं लावलं. तो युवक राष्ट्र स्थापनेसाठी झपाट्याने अथक मेहनतीने कामाला लागला. देशावरच्या, कोकणातल्या अनेक तरुणांनी हजारो हातांनी आणि निधड्या छातीने शिवरायांना साथ दिली.. अशा राष्ट्र उभारणीच्या भारलेल्या वातावरणात संत, महंत तरी कसे मागे राहतील. मे महिन्यात विजापूर दरबारी अफझलखानाने शिवाजीवर जाण्याचं ठरलं..**

प्रत्येक क्षण वीर रसात बुडवलेला, प्रत्येक क्षण अचूक नियोजनात जडवलेला, प्रत्येक क्षण राष्ट्र उभारणीच्या रंगाने रंगवलेला, आणि प्रत्येक क्षण रयतेच्या सुखासाठी सार्थकी लावणारा एकमेव राजा म्हणजेच शिवाजीमहाराज. असमर्थ राजाच्या रक्षणासाठी खंडणी घेणारा आणि पावती फाडून देणारा त्याच्या आधी आणि त्यांनतर आजपर्यंत कुणीही राजा जन्माला नाही. (उलट खंडणी शब्दाची विटंबना झालेली आता दिसते) शहाजीराजांच्या भगव्या झेंड्याला, जरीपटका रूप देणारे शिवाजीमहाराजच पहिले. त्यांनी उत्कृष्ट गुणांना जवळ करून त्यांच्याकडून राष्ट्रनिर्मितीत काम करून घेतलं. त्यातलाच एक हिरा म्हणजे बहिर्जी नाईक. गुप्तहेर खात्याचा प्रमुख, नव्हे, त्यातला "शिवाजीच." राष्ट्र शत्रूपासून राखायचं तर गुप्तहेर सशक्त हवेत.

पण त्याकाळातील त्यांचे प्रतिस्पर्धीही कमी नव्हते. रस्त्याने जाणाऱ्या कासिदांच्या म्हणजे जासूदांच्या जोड्या पकडून त्यांच्याकडून बातम्या पोचवणारी पत्रे काढून घेतली जात. औरंगजेब तर असा उस्ताद की तो खोटी, बनावट पत्रेही शत्रूच्या फौजेत पसरवायचा. संशयाचं जाळं फेकून शत्रुत गोंधळा माजवायचा.

अशावेळी महाराजांना साथ देणारे खूप होते, त्यातले एक समर्थ जोडीदार म्हणजे समर्थ रामदास स्वामी. शत्रूशी लढायचं तर छातीत श्वास पाहिजे, अंगात बळ पाहिजे आणि मनात विश्वास पाहिजे. त्यासाठी कणखर शरीर संपदा पाहिजे तर भीती पळून जाणार. समर्थांनी तरुणांना समर्थ करण्याचा विडा उचलला. अकरा मारुतींची साखळी तयार केली. शक्तीची देवता मारुतराय.. त्याच्या मंदिराशेजारी तालमी उघडल्या.. तिथे येऊन आजूबाजूचे तरुण बळवंत होऊ लागले. शिवबांना लागणारी फौज तयार होऊ लागली.. पिचलेली मनगटे आणि मनाला हुरूप आला.

समर्थांनी आपल्या शिष्यांनाही कामाला लावलं. रामदासी भारतभर हिंडायचे. देऊळ, पाणवठे, नदीकाठ, चावडी, पार, बाजार, वाटसरू, पथिक, व्यापारी, जिथे जिथे समुदाय, तिथे तिथे लोकांमध्ये मिसळून बातम्या काढायचे आणि समर्थांकडे पोचवायचे. महाराजांना योग्य असेल अशी बातमी पोचवली जायची. संन्याशाची झोळी कुठलाही अधिकारी कधी तपासायचा नाही. त्यात मिळणार तरी काय ?

महाराजांकडे गुप्तहेरांनी बातमी आणली की विजापूरच्या दरबारात अफझल खानाने त्यांना ठार मारण्याचा विडा उचलला आहे. महाराज सावध झाले. शत्रूला संपवण्याच्या विचारांमध्ये गढले. पण ही बातमी विजापूर दरबाराने मुद्दाम महाराजांच्या फसवणुकीसाठी आणि फजितीसाठीही केलेली चाल असण्याचीही शक्यता तेवढीच होती. महाराज बातमी काढतच होते.

आणि एक दिवस किल्ल्याच्या दारावर महाराजांना एक रामदासी भेटायला आल्याची बातमी आली. महाराजांनी रामदासीला भेटीला बोलवलं. आपल्या झोळीतून समर्थांचा एक उपदेशपर अध्यात्मिक समास – अभंग हातात ठेवला आणि रामदासी निघून गेले.

महाराज खूष झाले, प्रसन्न झाले.. **विजापूरचा सरदार निघाला आहे** हे आता खात्रीशीर बातमी हाती आली होती. महाराजांना शत्रूला अंगावर घ्यायच्या तयारीला लागायला हवं होतं.

काय काव्य होतं ते ? नेहमीचाच उपदेश.. माणसाने प्रत्येक काम विचार पूर्वक विवेकाने करावं, परमेश्वर त्याच्या पाठीशी असतोच वगैरे वगैरे.

त्यात लिहिलं होतं,

**वि**वेके करावे साधन.

**जा**णार नरतनु जाणून

**पु**ढील भाविष्यार्थी मन .

**र**हाटोची नये.

**चा**लो नये असंमार्गी

**स**त्यता बाणल्या

**र**घुवीर कृपा ते प्रसंगी

**दा**स महात्म्य वाढवि.

**र**जनीनाथ आणि दिवाकर

**नि**त्यनेमे करिती संचार

**घा**लताती येरझार

**ला**विली भ्रमण जगदिशे.

**आ**दिमाया मूळ भवानी

**हे** ची जगताची जननी

**एकांती विवेके करुनी इष्ट योजना करावी ।.. .**

समर्थांनी लिहिलेल्या प्रत्येक ओळीचा पहिला शब्द घेतल्यावर महाराजांना लगेच विश्वासार्ह बातमी मिळाली. समर्थांनी या काव्यात प्राण जाण्याची शक्यता, महाराजांनी घ्यायची काळजी, आणि शांत मनाने एकट्याने इष्ट योजना करावी हा उपदेश करून प्रसंगाचं गांभीर्य महाराजांच्या कानावर घातलं. रजनीनाथ आणि दिवाकरौ शिष्यच असतील का त्यांचे ? त्यांच्याकडून विश्वासार्ह बातमी आली आहे हे सांगण्यासाठी हे शब्द घातले असतील का ? माहीत नाही.

शहाजीराजांनीही आपल्या पराक्रमी पुत्राकडे ही बातमी पोचवलीच होती. अफझलखानाने दगाबाजीने शहाजीराजांच्या मोठ्या मुलाला,

संभाजीराजांना, दगाबाजीने मारलं होतं, आता तो दगाबाज खान दुसऱ्या पुत्राच्या प्राणाची शपथ घेऊन निघाला होता. जिजाऊ माउलीने आपल्या या महान पुत्राला मनापासून आशीर्वाद दिला.

कॅप्टन ग. वा. मोडकांनी आपल्या " प्रतापगडाचे युध्द " या पुस्तकात समर्थांचा हा समास घातला आहे. सेनापती म्हणून महाराज किती श्रेष्ठ होते ते दाखवून दिलं आहे. ते स्वत: लष्करी सेवेत असल्यामुळे शिवरायांचं एक सेनानी म्हणून युद्धकलेतील असामान्य प्रभुत्व, कौशल्य, दाखवून दिलं आहे. महाराजांनी प्रतापगड का निवडला, शत्रूची बरीक सारीक बातमीही कशी मिळवली आणि आपल्या फौजेला कुठे आणि कसं ठेवलं, क्षणाक्षणाचं अचून नियोजन कसं केलं होतं ते मोडकांनी या प्रसंगाचं चित्तथरारक वर्णन सविस्तर लिहिलं आहे.. अफझलखानाने कपड्यांच्या आत चिलखत घातलं नव्हतं हेही महाराजांना माहीत होतं, एवढ्या बारीक सारीक पण अति महत्वाच्या बातम्या महाराज राखत.

महाराजांच्या शौर्याला तुलनाच नाही.

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS

# सारायेवो. एक वणवा.

एक बारीक ठिणगी थोराड वृक्षांची नाजूक वेलींची, त्यातील हत्तीपासून मुंगी पर्यंतच्या प्राणिमात्रांची राख करून जंगलाचं अस्तित्वच नाहीसं करून टाकते. पिस्तुलाच्या एका लहानशा गोळीने साऱ्या विश्वाला असंच होरपळवून टाकलं. त्या वणव्यात मानवी देहाची उभी पिकं करपली. समाजाची उलथापालथ झाली. जगभरच्या संस्कृतीने जुनी कात टाकली. मानवी आदर्शाचे पहिले मनोरे कोसळले. क्रौर्याने भस्मासुराचा नंगानाच केला. मृत्यूने कोट्यावधी प्राण घुसमटवले. त्या राखेतून एक नवीन सृष्टी उभी राहिली.

एका शतकात दोनदा घडलं हे ! आणि V for Victory ची खूण जन्मली.

२८ जून १९१४.

वेळ - सकाळी ११ वाजून ३५ मिनिटे.

स्थळ – बोस्नियाची राजधानी सारायेवो.

सारायेवोमधील सकाळ नेहमीसारखीच होती. युरोप मधला उन्हाळा. स्वच्छ सूर्यप्रकाश. निळेभोर आकाश. अनिष्ट ग्रहांची चाहूलही कुठेही नव्हती. तेव्हाच कोट्यावधी जीवांचा नाश करणारी, जग उलथून टाकणारी घडी जवळ येत चालली होती.

त्यादिवशी ऑस्ट्रीयाचे युवराज आर्चड्यूक फ्रांझ फर्डिनांड सारायेवोच्या भेटीला आले होते. उघड्या गाडीतून ते कार्यक्रमाच्या ठिकाणी निघाले होते. त्यांच्या गाडीचा ताफा राजमार्गाने चालला होता.. त्यांच्या शेजारी गर्भवती पत्नी सोफियाही बसली होती. मोटारींचा ताफा जवळ जवळ येत चालला तसे गर्दीतून अचानक काही तरुण पुढे आले. युवराजांची गाडी जवळ आल्याबरोबर त्यांनी गाडीवर बॉम्बगोळे टाकले. या अनपेक्षित हल्ल्याने बघ्यांमध्ये गोंधळ माजला. पण युवराज फर्डिनांड यांना ठार करण्याचा घातपाती कट फसला होता. युवराज सुखरूप होते. काळ आला होता पण वेळ अजून आली नव्हती. युवराजांना बघायला उभे असलेले काही नागरिक मात्र हकनाक मारले गेले. मोटारींचा ताफा पुढे निघून गेला. जखमी लोकांना तातडीने हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं.

युवराज फर्डिनांड कार्यक्रमाला गेले आणि परत येतांना जखमी लोकांची विचारपूस करायला हॉस्पिटलमध्ये गेले. भेट देऊन हॉस्पिटलमधून बाहेर पडले, रस्त्याला लागले आणि लॅटीन ब्रिजवरून समोरच्या लहानशा गल्लीत शिरले. ड्रायव्हरने उजवीकडे गाडी वळवली आणि तो रस्ता चुकला. तो वेगळाच मार्ग होता. योगायोगाने त्या मार्गावर सकाळच्या क्रांतीकारकांमधील एक तरुण तिथे उभा होता. त्याच नाव गॅवरिलो प्रिन्सेप. ती अचानक आलेली संधी त्याने साधली आणि युवराजांवर गोळी झाडली. इथे मात्र काळही हजर होता आणि वेळही. त्याने टिपलेल्या त्या क्षणाने युवराज आणि त्यांची पत्नी, दोघेही ठार झाले.

जागतिक महायुद्धाच्या होमकुंडातील ते पहिले दोन बळी, आहुती होते. ती पुढील कोट्यावधी लोकांच्या मरणाची सुरुवात होती. युवराजांच्या या घातपाती मरणाचे जगभर पडसाद उमटले. स्वाभाविकच होतं ते ! या क्रांतीकारकांना शेजारच्या सर्बियाने शस्त्र पुरवठा केला होतं. रशियाशी सर्बियाचे राजकीय संबंध होते. तर ऑस्ट्रियाचा मित्र होता जर्मनी. ही घटना घडल्यानंतर एक महिन्यात्त २८ जुलैला भावी युद्धाची पहिली ठिणगी पडली.

२८ जुलैला ऑस्ट्रियाने सर्बियावर युध्द पुकारलं. महिनाभरात रोगाच्या साथीची लागण व्हावी, तसं सारं जग या युद्धज्वराने पछाडलं. १ ऑगस्टला ऑस्ट्रियाची बाजू घेऊन जर्मनी रणांगणात उतरली. जर्मनीने रशियावर हल्ला करायचं ठरवलं. १८७१ च्या फ्रान्स आणि जर्मिनीच्या लढाईत फ्रान्सचा पराभव झाला होतं, त्याचा सूड उगवायला फ्रान्सने आता जर्मनीविरुध्ह हत्यार उपसलं. म्हणून रशियाशी मैत्री केली. त्याला प्रत्युत्तर म्हणून ३ ऑगस्टला जर्मनीने फ्रान्सबरोबर युध्द घोषित केलं. प्रशियाने ऑस्ट्रियाची बाजू घेतली. फ्रान्सवर हल्ला करण्यासाठी जातांना प्रशियाने बेल्जियम आणि लक्झेनबर्ग या तटस्थ देशांवर हल्ला चढवला, म्हणून चिडलेल्या इंग्लंडनेही युद्धात उतरायचं ठरवलं आणि जर्मनीविरुध्ह ४ ऑगस्टला लढाईला सुरुवात केली. मिळून, सर्व युरोपियन देशांमध्ये दोन संघ आणि आपापले भिडू तयार झाले. रशिया, फ्रान्स आणि इंग्लंडच्या संघाला '' ट्रिपल एन्टीटी '' नाव पडलं आणि जर्मनी-ऑस्ट्रिया हे '' सेन्ट्रल पॉवर '' या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यांना नंतर ऑटोमन सरकारही जाऊन मिळालं. आणि जपान, इटली, अमेरिका हे इंग्लंड-फ्रान्स-रशियाला सामील झाले. भारतात तेव्हा इंग्रजांची सत्ता होती, म्हणून भारतातील फौज युद्धासाठी वापरली गेली, आणि इथल्या संस्थानिकांनी रसद पुरवायची जबाबदारी घेतली.

२८ जुलै १९१४ ला सुरु झालेलं हे तांडव ४ वर्षांनी १९१८ साली थांबलं. पहिला शांतता करार ४ नोव्हेंबरला ऑस्ट्रियाने केला. त्यानंतर जर्मनीनेही आपला हात पुढे केला. पण तोपर्यंत या पहिल्या महायुद्धामुळे साऱ्या विश्वात प्रचंड उलथापालथ झाली. नवीन जग तयार झालं. इतिहास बदलला, भूगोल बदलला, विज्ञान बदललं, अनेक नवीन शोध लागले. प्रचंड जीवितहानी झाली. ९० लाखांपेक्षा जास्त सैनिकांना वीरगती मिळाली. 1. ५० सैनिक जायबंदी झाले. ७० लाखांपेक्षा जास्त निष्पाप नागरिक ठार झाले. ७, ५०,००० प्रशियन नागरिक इंग्लंडने केलेल्या नाकेबंदीमुळे उपासमार होऊन मरण पावले.

नवीन तंत्रज्ञानाचा आणि उद्योगांचा जन्म झाला. नवीन युद्धशास्त्र आणि युध्द साहित्याचा शोध लागला. या युद्धाच्या निमित्ताने ५२000 विमानं, २८,00 रणगाडे, २५,0000 मशीन गन्स, ४० लाख रायफल्स युध्द संपेपर्यंत वापरले गेले. ट्रक्स, लांब पल्ल्याच्या तोफा, सबमरीन बोटींचा शोध लागला. इटालीने १९११ साली लीबियावर विमान हल्ला केला होता, त्यात नव्याने भर पडली. शत्रूची विमानं पाडायला anti **anti aircraft guns** तयार झाल्या. विषारी वायुचीही निर्मिती झाली, ज्यामुळे अनेक निष्पाप पीडित नागरिकांना त्वचा विकार, श्वसन विकाराचा त्रास सुरु झाला. चेहऱ्यावर लावायचे मास्क अजून निघाले नव्हते. प्रशियाने विषारी वायूचा प्रथम वापर केला. प्रत्येक देशातील परदेशीयांचे, स्थलांतरितांचे खूप हाल झाले, मृत्यू दंडही त्यांना सोसावा लागला. ऑटोमन सरकारने या युद्धात आपल्या देशातील हजारो आर्मेनियन, ख्रिश्चन आणि ग्रीक लोकांना ठार केलं.

जर्मनीचा पराभव झाला आणि मित्र राष्ट्रांचा विजय झाला.

या पहिल्या महायुद्धात जगाचा नकाशाही साफ बदलला. युध्द सुरु झाल्याबरोबर, वर्षभरातच, आपण जिंकलो तर, अतिविशाल ऑटोमन साम्राज्याचा भाग कसा आणि कुणी वाटून घ्यायचा याची गुप्त खलबतं फ्रान्स आणि इंग्लंडमध्ये सुरु झाली. मार्च १९१५ साली हा गुप्त करार आकार घेऊ लागला. इंग्लंडतर्फे सर माईक साइक्स आणि फ्रान्सतर्फे फ्रॉन्काइज जॉर्ज पिको हे दोघे वाटाघाटी करू लागले. रशियाला या कारस्थानाला पूर्ण संमती होती. जर्मनी, ऑटोमन या महायुद्धात पूर्ण हरले. खनिज तेलाने भरलेल्या ऑटोमन साम्राज्याचे भरपूर तुकडे झाले आणि इंग्लंड-फ्रान्स-इटली-रशियाने ते वाटून घेतले.

रशियाने कॉन्स्टंटीनोपल, इर्झुरम, अर्मेनियाचा आपल्या सीमेजवळचा भाग, काळा समुद्र आणि भूमध्य सागराला जोडणारा दर्दानेल सामुद्रधुनीचा भाग,

आणि गॅलीलोपी द्वीपकल्प स्वत:कडे घेतला. इंग्लंडने मध्य पर्शिया, खनिज तेलाने भरलेला मेसापोटेमियाचा मध्य आणि दक्षिण भाग, आणि हैफा, एकर ही बंदरे, यावर ताबा मिळवला. फ्रान्सकडे मोसूल, जोर्डन लेबनॉनचा मोठा भूप्रदेश आला. थोडक्यात या पहिल्या महायुद्धात सौदी अरेबिया, जॉर्डन, सिरीया, रुमानिया, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, अल्जेरिया, ग्रीस, इराक, इजिप्त, लिबिया एवढे नवीन देश तयार झाले. पॅलेस्टाईन त्याच्या पवित्र आणि ऐतिहासिक महत्वामुळे अंतरराष्ट्रीय लवादाच्या नियंत्रणाखाली आला. रशियातून पोलंड, फिनलंड, लॅटेव्हीया या देशांची निर्मिती झाली. ज्या महाकाय ऑटोमन साम्राज्याची ही चिरफाड झाली, तो देश रिपब्लिक ऑफ टर्की राहिला.

या युद्धाच्या काळात फ्रान्स, जर्मनी, रशिया आणि ऑटोमन राजघराण्यांचा अस्त झाला. रशियात बोल्शेविक पार्टी उदयाला आली. ब्लादिमीर इलिइच उल्यानोव म्हणजेच लेनिन या नव्या क्रांतीनायकाने नवीन युग सुरु केलं. जुलै १९१७ ला झारशाहीचा अंत झाला. बोल्शेविक म्हणजे बहुसंख्य आणि मेन्शेविक म्हणजे अल्पसंख्य. कार्ल मार्क्स या नव्या विचारांच्या तरुणाने रशियन मनावर भूल घातली.

२४ नोव्हेंबर १९१७. आजचा दिवस रशियाच काय, जगाच्या नागरिकांना खळबळजनक होता. रशियातील प्रमुख अशा प्रावदा आणि इझावेस्तीया या वृत्तपत्रांच्या वाचकांना मोठाच हादरा बसला होता. फ्रान्स आणि इंग्लंडमध्ये झालेल्या गुप्त कराराचे कागद ट्रॉटस्कीने जगासमोर आणले. रशियाची सत्ता हाती आल्यावर मॉस्कोमधील अर्काईव्जवर लेनिनच्या लोकांनी छापा घातला, त्यात त्यांच्या हाती हे गुप्त कराराचे कागद लागले. ते त्यांनी प्रसिध्द केले.

इ. स. १९१८ ला पहिल्या महायुद्धाचा हा झंजावात संपला. पण तोपर्यंत जुनं विश्व उन्मळून पडलं होतं. काळया धुराने युरोपातील आकाश गुदमरून गेलं होतं. बॉम्बगोळयाने उध्वस्त झालेल्या हल्ल्यात भुईसपाट झालेल्या इमारतींचे ढीग जमिनीवर साठले. जनतेने आपलं मौल्यवान धन त्या ढिगाऱ्यात गमावलं होतं.

अनेक लेकराबाळांचे, मातांचे,वृद्धांचे तरुणांचे जीव त्याखाली चिरडले गेले होते. राष्ट्रीय संपत्तीची प्रचंड हानी झाली होती. त्याच राखेत एक निखारा जिवंत होता, भविष्यातील नरसंहारासाठी.. हिटलर त्याचं नाव.

त्या निखाऱ्याने शतकाच्या मध्यात पेट घेतला. या वणव्यात होरपळले अनेक निष्पाप ज्यू जीव. तीच राख. तोच नरसंहार. पण यावेळी जर्मनीबरोबर जपान रशिया होते.. इंग्लंड-अमेरिका फ्रान्स या दोस्तराष्ट्रांचा विजय झाला. विन्स्टन चर्चिल यांनी उजव्या हाताची पहिली दोन बोटे उंचावून V ची खूण केली आणि ती अमर झाली.

यावेळी दोन स्वतंत्र राष्ट्रांचा जन्म झाला. एक भारत आणि दुसरा इस्त्रायल. भारताचा ७०० वर्षांच्या पारतंत्र्याच्या वनवास संपला.

s. s. s. s. s. s. s. s. s. s. s. s. s. s. s. ss. s. s.

# स्वराज्यात अंधार.

**१ जानेवारीला भीमा कोरेगावात दोन वेळा राजकीय लढाया झाल्या. पहिली १८१८ सालामध्ये इंग्रज आणि मराठे यांच्यात आणि दुसरी २०१८ मध्ये सर्वच भारतीय राजकारण्यांमध्ये. पहिल्या लढाईनंतर मराठ्यांचा शनिवारवाड्यावरचा ध्वज खाली उतरला आणि युनियन जॅक त्यावर फडकला. मराठेशाहीचा अंत झाला. दुसरे बाजीराव हे त्याचे नायक.**

साडेसाती, दुष्ट ग्रह असतीलच तर ते मानवाच्याच नशिबी येत नाहीत, तर राष्ट्राच्या निर्मितीलाही भोगावे लागतात, असंच घडलं त्यादिवशी ! जानेवारीची एक तारीख, साल १८१८. मराठे आणि इंग्रज यांच्यातील सत्तेचा संघर्ष घडला त्या दिवशी. साम्राज्यवादी इंग्रजांना मराठ्यांना हरवणं सोपं नव्हतं, आणि त्यांना हरवल्याशिवाय पूर्ण भारतावर अधिकार गाजवणं अशक्य होतं. पण राष्ट्रप्रमुख समर्थ असेल तर तो जय खेचूनच आणतो, ते होणार नव्हतं. स्वराज्य मंदिराचे सगळेच खांब म्हणजे पेशवे-होळकर-शिंदे-पवार-पटवर्धन-रास्ते-भोसले, सर्वच इंग्रजांच्या समोर न टिकणारे झाले होते. काय फरक होता इंग्रजी आणि भारतीय फौजांमध्ये ?

मराठी फौजा म्हणजे शिंदे, होळकर, रास्ते, पवार यांच्या फौजा आणि इंग्रजी फौजा म्हणजे युरोपियन फौजा, इंग्लंडहून आलेल्या हुजरातीच्या आणि ईस्ट

इंडिया कंपनीच्या फौजा. उत्कृष्ट नवीन सुधारित, युध्दसाहित्य, फौजेला गणवेश, लढाईचे नियम, आणि भारतीय फौजा म्हणजे एकमुखी नेतृत्व नसलेलं अनेक लहान फौजांच्या पथकांचं ढिलंढालं गाठोडं. पैसा मिळवण्याचा एक पेशा, जो पगार जास्त देईल त्याचाकडे लष्करी चाकरी घेण्याची वृत्ती, स्वामीभक्तीचा अभाव, आणि निकृष्ट युद्धसाहित्य. ना एकोपा. ना इमानदारी.. ना मेहेनतीची आंच.

मराठ्यांच्या युद्धसाहित्याची काय अवस्था होती त्याचं वर्णन करणारं एक पत्र ले. मूर नावाच्या सेनाधिकार्याने लिहून ठेवलंय. टिपूबरोबरच्या लढाईत मराठ्यांच्या फौजा धारवाडचा किल्ला जिंकण्यासाठी त्या किल्ल्याला वेढा घालून बसल्या होत्या. तो लिहितो,

“ मराठ्यांकडे २० तोफा आहेत. त्या तोफांच्या बळावर किल्ला जिंकायला अजून २० वर्षे लागतील. त्या खूप जुन्या आणि निकृष्ट दर्जाच्या आहेत. काही तोफा उडवल्यावर त्याच्याच आगीने फुटतात. तोफखान्यावरचे लोक दारू भरतात. मग विडी पेटवून गप्पा मारत बसतात. अर्ध्या तासाने उठतात. तोफा डागतात. नुसता धूर निघाला तरी त्यांना बरं वाटतं. कुठेही तोफा मारतात. दिवसात दोन वेळा हे घडतं. दुपारी तोफा बंद. ( पिढीजात ? ) किल्ल्याच्या तटबंदीवर गोळे पोचतच नाहीत. दारूगोळा संपला की काम ठप्प. पुण्याहून तो येईपर्यंत वाट पहात बसतात. ”

ब्रिटीशांचा सामना होणार होता दुसऱ्या बाजीरावाशी. नाना फडणीसांच्या मृत्युनंतर ३ वर्षातच तो तर तैनाती फौजेचा करार करूनच १८०३ मध्ये गादीवर आला होता. त्यातच १८११ साली माउंट स्ट्यूअर्ट एल्फिन्स्टन पुण्याचा रेसिडेंट म्हणून दाखल झाला. इंग्लंडहून १६ मेमध्ये त्याला सक्त ताकीदच आली होती की लौकरात लौकर मराठेशाही संपेल ते बघा. त्यामुळे त्याच्या

अधिकाराचा बाजीरावाला त्रास होऊ लागला. इंग्रजांनी स्वराज्यातील जमिनी बळकावायला सुरुवात केलीच होती. त्यामुळे चिडलेल्या बाजीरावाने इंग्रजांना घालवण्यासाठी उठाव करायचं ठरवलं.

फौजा जमायला लागल्या. सर्व सरदारांना पत्रे गेली. रास्ते, पटवर्धन, थोरात, जाधव यांच्या प्रत्येकी २००० फौजा, सरदार बापू गोखले यांची १५,००० फौज, विंचूरकर सरदारांची १०००० सेना, नंगे गोसावी ३०००, अरब १०,००० अशी मोठी फौज जमली. सेनापतीपद बापू गोखल्यांना दिलं. पण बापू गोखल्यांना बाजीरावाचा चंचल आणि कमकुवत स्वभाव माहीत असल्याने त्यांनी ते बाजीरावाकडून लिहून घेतलं. इंग्रजांना घालवण्याची ताकद त्यांच्यात होती.

चतु:श्रुंगीच्या टेकडीपासून आताच्या शेतकी कॉलेजपर्यंत मराठ्यांची सेना पसरली. एल्फिन्स्टन तेव्हा संगमावरच्या बंगल्यात राहत होता. त्याच्या घरासमोर सगळया फौजा पसरल्या होत्या. त्यानेही मग मुंबईहून फौजा मागवल्या. त्यांच्या फौजेचा तळ खडकीच्या माळरानावर पडला. आपल्याजवळचे पेशव्यांच्याविरूद्धचे कटाचे गुप्त कागद जाळून एल्फिन्स्टन आपल्या फौजेत मुक्कामाला गेला.

१८१७ च्या ५ नोव्हेंबरला युद्धाला तोंड फुटलं. बापू गोखलेंनी इंग्रज फौजेवर तोफा चालू केल्या. दोन्हीकडे गोळागोळी सुरु झाली. बाजीराव पेशवा पार्वतीच्या टेकडीवरून लढाई पाहू लागला. तेवढ्यात त्याने लढाई थांबवण्याचा निरोप पाठवला. त्यामुळे तोफा बंद कराव्या लागल्या. पुढचे ११ दिवस पेशव्याच्या धरसोडीच्या स्वभावामुळे फुकट गेले आणि १६ नोव्हेंबरला जनरल स्मिथनेच मराठी फौजेवर हल्ला केला. येरवडा भागात मध्यरात्रीपर्यंत ही लढाई झाली, पण आदल्या दिवशी रात्री घाबरलेला पेशवा आपल्या भावाला घेऊन निघून गेला. शहर सोडून त्यांनी जाऊ नये म्हणून बापू गोखल्यांनी पेशव्याची खूप मनधरणी केली पण

पेशवा गेलाच. मालकच निघून गेल्यामुळे इंग्रजांना पुण्यावर कब्जा मिळवायला त्रास पडलाच नाही.

पुणे शत्रूच्या हातात गेल्याबरोबर नागरिक घाबरले आणि गाव सोडून सैरावैरा धावू लागले. दुकानं बंद झाली, अफवांना जोर आला. गावात शांतता ठेवण्यासाठी एल्फिन्स्टनने ताबडतोब शनिवारवाड्यावर निशाण लावण्याचा हुकूम सोडला. ती जबाबदारी बाळाजी नातूंवर सोपवली. नातू शनिवारवाड्यावर गेले. किल्ल्या मागवून  दरवाजा उघडला, पेशव्यांच्या गादीला त्यांनी मुजरा केला आणि आकाशदिव्याच्या काठीला निशाण लावलं.

**१७ नोव्हेंबर १८१७, स्वराज्याचा अस्त झाला. शिवरायांनी स्थापलेलं, थोरल्या शाहूराजांच्या आधाराने शिंदे-होळकर-पवार-वगैरे आपल्या साथीदारांना उत्तरेत स्थापून बाजीरावाने विस्तारलेलं स्वराज्य अंधारात बुडालं. परकियांच्या हाती पडलं.**

पेशव्यांचा गाव हाती आला पण पेशवा हाती यायचा होता. ती कामगिरी करायला जनरल स्मिथ निघाला. पण पेशव्याने सतत गावं बदलत इंग्रजी फौजांना हुलकावणी देण्याची रणनीती आखली.. त्यांच्या रक्षणासाठी बापू गोखले फौज घेऊन पेशव्याच्या मागे धावत राहिले. पुणे-पुरंदर-अथणी-माहुली-फलटण-पंढरपूर-सिद्धटेक-नगर-संगमनेर असं सतत पळत राहिला. संगमनेरावरून तळेगाव ढमढेरे-पाबळ -नारायणगाव ओतुरावरून ब्राह्मणवाड्यावर आला. इथे बापू गोखल्यांच्या तरुण मुलगा अल्पशा आजाराने मरण पावला आणि त्याची १२ वर्षांची बायको सती गेली. सेनापती गोखलेंना हा मोठा फटका होता. पेशव्यांची फौज मग ओझरचा घाट उतरून जुन्नर खेडवरून चाकणला येऊन पोचली. ४५ दिवसांमध्ये बाजीराव पेशवा ४०० मैल धावत राहिला. जनरल स्मिथ त्याच्या पाठलागाने रडकुंडीला आला.

आता चाकणपर्यंत पोचलेल्या बाजीरावाला पुण्यात शिरकाव करू न देण्याची मोठी कामगिरी स्मिथला करायची होती. त्याने शिरूरवरून कॅप्टन स्टॉटनला फौज घेऊन मदतीला बोलावलं. कॅप्टनकडे बॉम्बे नेटीव्ह इन्फंट्रीच्या फर्स्ट रेजिमेंटच्या सेकंड बटालियनचे ५०० सोल्जर्स, आणि महार, राजपूर, मुसलमान यांची देशी फौज होती. बापू गोखले पेशव्यांच्याबरोबर असल्याने इंग्रजांशी लढायला अरब आणि गोसावी फौज उभी राहिली.

३१ डिसेंबरला २५ मैलांचं अंतर तुडवत इंग्लिश फौज शिरूरहून कोरेगावावर आली. त्यांना ५००० फौज येऊन मिळाली. कोरेगावच्या गढीत इंग्रजी फौजा राहिल्या. १ जानेवारीला लढाईला सुरुवात झाली. इंग्रजांच्या हाती असलेलं कोरेगावालगतचं देऊळ गोसाव्यांनी काबीज केलं. भीमेच्या कोरड्या पात्रातील तोफखान्यावरची ११ माणसंही मारली. भूक आणि तहानेने व्याकूळ झालेले इंग्रजांचे सैनिक तह करायला सांगू लागले. पण स्टॉटनने निर्धाराने लढायचं ठरवलं. तलवारी आणि बंदुका, दोन्हीची लढाई सुरु झाली. रात्री ९ वाजेपर्यंत लढाई झाली. मग मराठ्यांची फौज आपल्या तळावर निघून गेली. कोरेगाव इंग्रजांच्या ताब्यात राहिलं.

इंग्रजांचे कंपनी ट्रूपमधील २३४, आणि इन्फंट्रीचे ५० सैनिक ठार झाले. भारतीय फौजेतील २२ महार, २ ज्यू, २ मुसलमान, ८ राजपूत शहीद झाले. ३ दिवसांनी एल्फिन्स्टन भीमा कोरेगावला भेट द्यायला आला. आपल्या शूर सैनिकांनी पेशव्यांच्या फौजेशी जो सामना केला, त्याची आठवण म्हणून ईस्ट इंडिया कंपनीने तिथे एक विजयस्तंभ उभारला. त्यावर आपल्या वीरगती मिळालेल्या महार, राजपूत, मुसलमान ज्यू वगैरे सर्वांची नावेही लिहिली.

इंग्रजी फौजा मग पेशव्यांच्या मागे लागल्या. पेशव्याने पळत राहण्याचं धोरण चालूच ठेवलं. २० फेब्रूवारी १८१८ या दिवशी सेनापती बापू गोखले

सोलापूर पंढरपूर मार्गावरील गोपाळअष्टी इथल्या लढाईत ठार झाले. अखेर ६ महिन्यांनी 1 जूनला बाजीराव पेशवा धूळकोट या गावी इंग्रज अधिकारी माल्कमच्या हाती लागला.

स्वराज्याची अखेर झाली. दुसरा बाजीराव आरामात कानपूरजवळ विठूरला पेन्शन भोगत अखेरपर्यंत राहिला.

इंग्रजी सत्तेमुळे भारतही एकसंघ झाला. काळ बदलला. राजसत्तेचा प्रवाह बदलला. नवीन भारत निर्माण झाला पण पारतंत्र्यात राहिला.

मराठ्यांच्या इतिहासात दोन बाजीराव झाले. पहिले पराक्रमी आणि दुसरे हे बाजीराव.. त्यांचेच नातू.

( 1 जानेवारी १९२७ या दिवशी भारताचे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या विजयस्तंभाला भेट दिली. वीरगती मिळालेल्या सैनिकांच्या घराणी कृतकृत्य झाली. तेव्हापासून दरवर्षी इथे मेळावा होतो. )

ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ. ऽ.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.